# ।। चैतन्य लहरी ।।

सन १९९५-९६ क्र.: १ व २



आपण अत्यंत महान सहजयोगी होण्याची इच्छा करा, आपण एक जबाबदार सहजयोगी होण्याची इच्छा करा. आपण माताजींना पूर्णपणे शरण जाण्याची इच्छा करा. हे काही कठिण नाही.

\- श्री माताजी निर्मलादेवी

[illegible] पूजा [illegible] दि. १९ डिसेंबर १९८३

# श्री राजलक्ष्मी पूजा

(दिल्ली ४ डिसें. १९९४)

आज आपण श्री राजलक्ष्मीची पूजा करणार आहोत. ती सर्व राजांवर राज्य करणारी आहे. म्हणून येथे एक महत्वाची गोष्ट समजावून घेतली पाहिजे की आपल्या राजकीय प्रणालीमध्ये काही दोष आहेत आणि लोक न्यायाची जाणीव, सदाचार व लोककल्याणाच्या गोष्टी विसरले आहेत. आपण कोठे चुकलो की ज्यामुळे या सर्व गोष्टी विसरलो. हे फक्त भारत, जपान किंवा इतर दुसरे देशही नाहीत, जेथे आपण समजतो लोकशाही आहे. आणि सर्वप्रथम विशेष महत्वाची बाब म्हणजे हे सर्व देश ज्यांना स्वातंत्र्य मिळाले, ते अशा देशांचे अनुकरण करतात जे महान, प्रबल, सत्ताधारी आहेत, जसे अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड, ज्यांच्याकडून विशेष कार्याची अशी अपेक्षा होती, त्यात ते कुठपर्यंत पोहोचले हे समजावून न घेता.

इंग्लंडच्या बाबतीत पाहिलं तर तेथील राजसत्ता पध्दती ज्याप्रकारे कार्यरत होती, ती पूर्णपणे धक्कादायक होती. क्रोमवेलसारख्या मंत्र्याला त्यांनी ज्याप्रमाणे वागणूक दिली ती पाहून कोणी पुरातन काळातील लोकांची ही व्यवस्था आहे. राजा राणी नुसते क्रूरच नव्हते तर चरित्रहीन व बेजबाबदार होते. ते कल्याणकारी अशा राजलक्ष्मी तत्वाला समर्पित नव्हते. प्रत्येक देशात खालच्या स्तरावरील लोक आहेत आणि ते लाकांच्या कल्याणासाठी यत्न करतात. तसेच समुराईचा इतिहास वाचला तर तो सुध्दा धक्कादायक आहे. त्यांनी आपल्या शेवटाचा कधी विचार केला नाही. त्यांच्या वर्तनावरून त्यांचा प्रजेशी कु ठल्याही प्रकारे संबंध नव्हता असे दिसून येते. नंतर तुम्ही कम्युनिस्ट देशाकडे वळाला तर तेथेही तोच प्रकार. तेथे जे राज्यकर्ते अस्तित्वात होते ते सगळेच जुलमी होते.

आता दुसऱ्या टोकाकडे गेलात तर हिटलरसारखा माणूस असतो की ज्याला आपल्या शेवटाची पर्वा नाही. फ्रँकोने स्पेनवर राज्ये केले. ज्यांना काही चारित्र्य नाही. ज्यांच्यात प्रजेपेक्षा उच्च गुणविशेष नाहीत. असे लोक आपल्या प्रजेचे कसे भले करतील ? हे शक्यच नाही. मी सांगू शकते की आमच्या देशात नावाजलेले राजे झालेत. कारण आमचा मोठा ठेवा आहे. जेथे संतांनी खरोखर राजांना सन्मार्ग दाखविला. जसे शिवाजीचे गुरु हे मोठे संत होते. जनकाचेही गुरु होते. प्रत्येकाचेच गुरु होते. तसेच श्री रामाचेही होते. पण ते सर्व खरे गुरु होते. त्यांचे जीवन ते संतांप्रमाणे जगले. आतून बाहेरून ते पूर्णपणे संत होते. ज्या राजांना आध्यात्मिक पाया होता. अशा राजांनाा प्रजेने पण स्विकारले. त्यांनी भाविक लोकांचाही मान राखला. इंग्रज केव्हां आले आणि त्यांचे काय झाले मला माहित नाही आणि ना कधी त्यांची प्रशंसा केली. त्यावेळच्या संस्थानातील राजे व राण्यांना असे वाटत होते की आपण कोणीतरी उच्चभ्रू लोक आहोत आणि त्यांनी या इंग्रजी संस्कृतीचा स्विकार केला आणि अशा आधुनिक राण्या धुम्रपान व मद्यपान करू लागल्या. मला असे सांगण्यात आले की इंग्लंडमधून आलेल्या गव्हर्नेसकडून त्यांना असे शिक्षण मिळाले आणि लोकांनाही आपण मागासलेले आहोत अशी जाणीव होऊ लागली. इंग्रजांनी इथल्या लोकांत अशी जाणीव निर्माण केली की तुम्ही मागासलेले आहांत. तुम्हाला धुम्रपान, मद्यपान आणि नृत्य कसं करायचं याची काहीच माहिती नाही. इथल्या लष्करी लोकांतही याची लागण लागली. अजूनही लष्करांत इंग्रजी रितीरिवाज पाळले जातात. लोकांना इंग्लंडविषयी माहिती आहे पण आपल्या देशाची नाही.

शिक्षणप्रणालीसुध्दा इंग्लंडमधून आली. आणि तिच्यावर इंग्लंड आणि पाश्चिमात्य जीवनाचाच पगडा होता. भारतातील गोष्टींबद्दल कोणालाच चिंता नव्हती. औषधीच्या बाबतीतही असे झाले. वैद्यांचे कोणी एक ऐकत नव्हते. लोकांना ते जुनाट व मागासलेले वाटत. राजसत्तेत आध्यात्मिक वर्चस्व असलेला हा एक देशसुध्दा रसातळाला गेला.

स्वातंत्र्य मिळायच्या आधी आम्हांला ब्रिटीश लोकांशी लढा द्यावा लागला आणि लोकांत किती देशप्रेम होते. मला आठवते की आम्ही एक हॉकीचा सामना पहाण्यास गेलो होतो आणि वडीलांच्या ज्या मोटारीतून गेलो होतो त्या मोटारीवर एक तिरंगा होता. काही शिपाई आले आणि आमच्या ड्रायव्हरला म्हणाले खाली उतरा आणि हा ध्वज काढून टाका. ड्रायव्हर खाली उतरला आणि म्हाणाला आधी माझा गळा कापा मग ह्या ध्वजाला हात लावा. आम्ही सर्व मुले त्याचेभोवती जमलो आणि हे सगळे पाहून ते शिपाई चकीत झाले व ते निघून गेले. अशा तऱ्हेचा उत्साह आणि देशभक्ती त्यावेळेला दिसली, ज्यावेळेला आम्ही ब्रिटीशांशी झगडत होतो, त्यांनी या देशाचे तुकडे केले आणि आमच्यापुढे एक समस्या निर्माण केली. आणि स्वातंत्र्याच्या फळांचा आस्वाद घेण्याअगोदरच आपापासात झगडू लागलो. मला समजत नाही याबाबत कोणास दोष द्यावा.

जर ही फाळणी स्विकारली नसती तर कुठलाच प्रश्न उद्भवला नसता. पण त्यांनी हे स्विकारले. बांगलादेशीय हे फार गरीब आहेत. ते जर भारतात राहिले असते तर त्यांची स्थिती अधिक चांगली असती आणि पाकिस्तान तरी काय तो एक वैराण देश आहे. जेथे कोठलेही कारखाने नाहीत आणि म्हणून ते नेहमी काश्मीरचा डांगोरा पिटतात. दुसरे काही नाही. तेथे लोक आपापसात झगडतात इत्यादी. त्यामुळे तेथे प्रगती नाही. इकडे एखादी आणिबाणी निर्माण झाली की लगेच जीवनाची मूल्ये बदलतात. असे नाही की पश्चिमेत मूल्ये नाहीत पण युध्दाने ते पूर्णपणे बदलले. त्याचप्रमाणे भारतात या लढ्यात ज्यांनी आपले प्राण गमावले व जे काहीतरी चांगले करण्याकरिता पुढे आले ते आदर्श समजले जात. नंतर लोकांची पूर्णपणे पाठ फिरवली आणि ते आत्मकेंद्रीत बनले. स्वार्थी झाले आणि स्वतःच्या कुटुंबाबद्दल, संपत्ती जमविण्याकडे, येथील पैसा स्वित्झर्लंडमध्ये पाठविण्याकडे एवढीच त्यांना चिंता आहे माझे आई वडील त्यांचे मित्र आणि आमचेकडे येणारे अनेक लोक यांना मी चांगले जवळून पाहिले. त्यात अनेकजण शीख व मुस्लिम होते. त्यांनी कधी पैशाचा लोभ दाखविला नाही. असे करणे म्हणजे शुद्र गोष्ट आहे असे त्यांना वाटत होते. काही मागणे जरुर नव्हते, जेव्हां तुम्हाला काय हवे, याबद्दल तुम्ही हृदयापासून समाधानी असाल. तुमचे स्वातंत्र्य ते तुम्हाला कसे मिळाले.

पण आता लोकांकडे पहा, जे सतत मागे राहिले, देशाकरितां कधी कसलाही त्याग केला नाही ते वर आले आणि सज्जन होते ते मागे पडले. जर तुम्ही शिवाजी महाराज किंवा राणा प्रताप किंवा शालिवाहन पैकी कोणाचा इतिहास वाचला तर शक्तीची ज्याप्रकारे पूजन करत, त्याचे तुम्हाला नवल वाटेल. सर्व क्षत्रिय शक्तीचीच पूजा करत. धर्माचे त्यांनी कधीही उल्लंघन केले नाही. आणि ह्या फाळणीमुळे लोकांचा दृष्टीकोन सुक्ष्मरित्या बदलला किंवा मी असे म्हणेन जे लोक खालच्या पातळीवर होते ते वर आले.

नुकतीच फाळणी झाली होती. माझे लग्न झाले होते. मी आमच्या घराच्या बगीच्यात लोकर विणत बसले होते. मी माझ्या होणाऱ्या बाळाकरिता लोकर विणत होते. तीन व्यक्ती माझ्याकडे आल्या आणि माझ्याकडे बघून म्हणाले 'आम्हाला रहाण्यासाठी तुमच्याकडील खोली मिळेल कां ? मी म्हणाले का नाही. माझ्या वडिलांचे ते मोठे घर होतें. आम्ही निर्वासीत आहोत, आम्हाला एक दोन महिन्याकरिता जागा हवी' मी म्हणाले ठीक आहे. पलीकडे बाहेरील बाजूस छोटी खोली आहे तसेच लागून स्वयंपाकघर व बाथरुमही आहे. तुम्ही तेथे राहू शकता आणि तुमचा आम्हाला त्रास होणार नाही. आणि मी त्यांना ती खोली रहाण्यास दिली. संध्याकाळी माझे यजमान आणि थोरले बंधु आले आणि माझ्यावर ओरडायला लागले. ते लोक बाजूच्याच खोलीत होते. यांचे ओरडणे चालू, कुठल्या लोकांना तू ठेवले ? ते कोण ? कशाकरिता आलेत ? इ. मी म्हणाले ते काय करतील ? ते फारतर चोरी करतील. या घरात चोरी करण्यासारखे काय आहे, ते निराश्रीत आहेत पण मला ती चांगली माणसे वाटतात. माझ्या चैतन्य लहरीप्रमाणे ती चांगली वाटतात. ते म्हणाले नाही नाही, त्यांना बाहेर काढ. मी म्हणाले त्यांच्याकडे पहा, ते केवळ निराश्रित आहे म्हणून

त्यांना हाकला म्हणतां कां ? मला वाटते, 'या देशात एक नवी लाट आली', माणसाकडे जर पैसा नसेल तर त्याला काही मान नाही, त्याच्यावर विश्वास ठेवत नाही. खरं तर हे उलट पाहिजे ज्याच्याकडे पैसा आहे, त्याच्यावर विश्वास न ठेवलेला बरा. या देशात ज्यांच्याकडे पैसा नाही ते जास्त प्रामाणिक असतात. त्यांच्यापेक्षा ज्यांच्याकडे पैसा आहे व लबाड आहेत, असं हे सगळे घडले. मी म्हणाले तर येथे कोणी रहाणार नाही. मी पाय रोवून उभी राहिली आणि त्यांना सांगीतले ते येथेच राहतील. ते गरीब लोक एक महिना तेथे राहिले. त्यांना थोडे अवघड वाटले असेल आणि त्यावेळेस काही संघटना अस्तित्वात होत्या. जशा शीख लोकांच्या किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इ. त्यातील काही लोक आमच्या घरी आले आणि मला म्हणाले की तुमच्याकडे कोणी मुसलमान रहात आहे असे आम्हाला कळाले आहे. राहणाऱ्यापैकी एक मुस्लीम होता. त्या लोकांना या मुसलमानाला मारायचे होते. मी म्हणाले तुम्हाला असे कसे वाटले की येथे मुसलमान आहे. आम्हाला तशी बातमी लागली आहे. मग मी म्हणाले 'खोटं आहे, येथे कोणी मुसलमान रहात नाही. मी त्यांना खोटे सांगीतले. ते मला म्हणाले 'आम्ही तुमच्यावर कसा विश्वास ठेवायचा ? मी म्हणाले 'बघा मी कुंकु लावते आहे, मी हिंदु आहे. मी माझ्या घरात मुसलमान कसा ठेवीन. मी त्यांना स्वतः घावरते आणि आमच्याकडे तसा कोणीही नाही. मी जरी खोटं बोलत होते, तरी कसाबसा त्यांनी माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवला. त्यांनी रक्ताने माखलेल्या तलवारी आणल्या होत्या. पण मी घावरले नाही. मी अगदी खडसावून सांगीतले. माझ्या जागी कोणी असती तर सांगीतले असते की ते येथे आहेत, त्यांना घेऊन जा. नंतर त्या तिघांनी घर सोडले. त्यातील एकजण खूप मोठी अभिनेत्री झाली, दुसरा मोठा कवी झाला तर तिसरा मोठा लेखक झाला.

एकदा असे झाले की तरुण लोकांचा एक चित्रपट काढायचा होता आणि मी त्याची व्हाईस चेअरमन होते. त्यांना त्या अभिनेत्रीस बोलवायचे होते. मी म्हणाले तिला माझे नाव सांगू नका कारण ती मला विसरली होती. तिला जर माझे नाव समजले तर ती बळजबरीने हो म्हणेल. जेव्हा लोक त्या अभिनेत्रीकडे गेले तर ती म्हणाली मला ठराविक रंगाची साडी, चप्पल व पर्स व काही रोख पैसे द्यावे लागेल. ते म्हणाले हा आमचा सन्मान आहे. तिने कदाचित ऐकले नसते. मी म्हणाले तिला जे पाहिजे ते तिला द्या. मी जेव्हा उद्घाटनाला गेले, तिने मला पाहिले आणि तिला राहवले नाही. तिच्या डोळ्यातून अश्रू आले. ती माझ्या पायाशी आली, म्हणाली, तुम्ही कशा आहांत ? लोक म्हणाले ' यांनीच हा चित्रपट तयार केला आहे. ती म्हणाली 'यांनी चित्रपट तयार केला ? तुम्ही मला का सांगीतले नाही. हे देवा असे म्हणून ती स्वतःला सावरु शकली नाही आणि रडू लागली, थांबवेच ना. मी म्हणाले आता पुरे तर ती म्हणाली 'तुम्ही माझ्याकडून पैसे घ्या, मी सर्व चित्रपटाचे पैसे देईन यांनी माझ्याकरिता काय केले नाही. त्यांनी माझ्याकरिता जे केले, दुसरे कोणी एवढे करणार नाही. तिने लगेच नवऱ्याला फोन केला आणि ते लगेच धावत आले. त्यावेळेस माझ्या बंधुना व माझ्या यजमानांना लोकांवर कसा विश्वास ठेवावा हे माहित नव्हते. पण मी पूर्णपणे विश्वास ठेवला. ते नेहमी म्हणते ते लोक तुझा गळा दाबतील ? वगैरे वगैरे. का ? का ? ते लोक मला का मारतील ? कशासाठी ? त्यांना सगळ्या गोष्टी विचित्र वाटत. मला वाटतं ते घाबरत होते. कारण त्यांच्याकडे पैसे नव्हते. मला वाटते ही शेवटाची सुरुवात आहे.

आमच्या देशांत यानंतर पैशासाठी लढा चालू झाला. अनेक लोकांना याचा त्रास झाला. गरीबांना याचे काहीच वाटत नव्हते. कारण त्यांना हे नेहमीचेच होते. जेवढे पैसे मिळत त्याचे ते जेवत व झोपून जात. त्यावेळेला मला समजले ज्या लोकांकडे पैसा व सत्ता आहे, ते दुसऱ्या प्रत्येकाला घाबरतात आणि येथेच आमच्या अधोगतीला सुरुवात झाली. आम्ही घाबरलो. जे सत्तेवर होते तेही घाबरले, की माझी खुर्ची जाईल, पैसा जाईल, सत्ता जाईल, या सारख्या भितीमुळे ते सारखे बेचैन असत. समजा मी निर्धन आहे तर काय ? हे सर्व विचार लोकांच्यात फाळणीनंतर येऊ लागले. मी लहान असतांना, आमच्या वडीलांनी कधीही घराला कुलुप लावलेले नाही. ते घर तसे मोठे होते पण कधीही त्याला कुलुप घातले नाही. आमच्याकडे एक सुंदर ग्रामोफोन होता. एके दिवशी चोराने तो पळवला. दुसऱ्या दिवशी वडील म्हणाले त्याला संगीताची आवड असेल म्हणून चोरला असेल पण त्याने रेकॉर्ड नेल्या नाहीत. त्याच्याकडे काय आहे, त्याला या रेकॉर्डस् दिल्या पाहिजेत. त्यांना खिजवण्यासाठी आई म्हणाली 'तुम्ही जाहिरात द्या,

ज्याने हा ग्रामोफोन नेला असेल त्याने या रेकॉर्डसुही घेऊन जाव्यात. त्याच्यासाठी त्या उपलब्ध आहेत. त्यांना ते खरेच वाटले, "आपल्याकडे निदान पैसे तरी आहेत त्याजवळ तर काहीच पैसा नसेल आणि त्याला संगीत तर ऐकायचे". शेवटी ते तयार झाले नाहीतर तो गुन्हेगारांचा वकील किंवा राजकारणी असता.

त्यावेळच्या राजकीय पुढाऱ्यांना अशी भावना होती की आपल्याकडे जे आहे ते नसलेल्या लोकांचे राहणीमान कसे सुधारता येतील ? सगळ्यांनी सढळ हस्ते पैसा दिला. एक लक्ष्मीनारायण नावाचे त्यांनी आपला होता तेवढा सर्व पैसा एका विद्यापीठाला दान दिला. त्यावेळी जी जी काही कार्ये झालीत ती सर्व देणग्यातून झाली. आपल्या मुलांकरीता पैसा वाचवावा असे कधी त्यांना वाटले नाही किंवा कोट्याधीश व्हावे असा त्यांनी कधी विचार केला नाही. जेवढा काही जवळ पैसा होता तो दान करावा आणि दुसऱ्याकरीता काहीतरी सत्कृत्य करावे म्हणून राजलक्ष्मीमुळे जी लोकांचे कल्याणच पहाते. अशा लोकांना काही सांगायची जरुर नाही, ते आपलेच कार्य आहे असे समजतात. लोकांचे जीवनमान वाढवावे यासाठी ते काळजी घेतात. हेच त्यांचे विचार असतात. पक्षीय राजकारण्यासारखे त्यांचे विचार नसत कोण वर येते आणि कोणाला ठार मारायचे.

लक्ष्मी देवता जिचे राजकारणावर राज्यांवर अधिपत्य असते, तिचा पहिला परिणाम म्हणजे औदार्य. उदा. श्री महावीर ध्यानात होते. त्यांच्या शरीरावर एकच कपडा होता. कपड्याचा वरचा भागझुडुपात अडकला आणि तो फाटला. राहिलेल्या अर्ध्या कपड्यातच ते निघाले. श्रीकृष्णांना त्यांची परिक्षा पहावयाची होती ते म्हणाले 'माझ्या अंगावर कपडे नाही, मी नग्न आहे'. ते एका भिक्षुकाप्रमाणे आले होते, तुम्ही तुमचा कपडा मला द्या, तुम्ही राजवाड्यात जाऊन परत कपडे परिधान करु शकता'. ते म्हणाले ठीक आहे आणि तो कपडा दिला. त्यांनी मग पानांनी आपले अंग झाकले व राजवाड्यात गेले पण जैन लोक त्यांचा मोठा नग्न पुतळा करुन त्यांचा अपमान करतात. येथे मग तुम्ही देवीचे पूजन करत नाही.

देवी ही श्री शोभा आहे. ती तुम्हाला शोभा आणते. ती आई आहे, ती तुम्हाला विविध अलंकारांनी व कपड्यांनी सुशोभीत करते. जनक हे राजा होते. त्यामुळे त्यांना सर्व प्रकारचे अलंकार व सुशोभित कपडे घालावे लागत व सर्व काही करावे लागे. जेव्हा नचिकेत त्यांचेकडे गेले, तेव्हा जनकाला पाहून ते थक्क झाले, की माझ्या गुरुने मला जनकांकडे का पाठविले. आणि तेथे एक नृत्याचा कार्यक्रम होता ते म्हणाले 'हा राजा संत नाही. मग माझे गुरु यांच्या पायाला स्पर्श कसे करतात ? राजा जनकालाही समजत होते नचिकेत कसला विचार करत आहे. राजा नचिकेतला म्हणाला 'तू येथे कशासाठी आला आहेस. नचिकेत म्हणाला 'मी इकडे आत्मसाक्षात्कार घेण्यासाठी आलो आहे'. राजा जनक म्हणाले 'तू माझे राज्य घेऊ शकतो पण आत्मसाक्षात्कार मिळविणे सोपी गोष्ट नाही. तो म्हणाला 'ठीक आहे, तुम्ही जसे म्हणता तसे मी करेन'. म्हणून राजाने त्याच्या डोक्यावर साप ठेवला आणि त्याला झोपण्यास सांगीतले. पण तो झोपू शकला नाही. नंतर ते स्नान करण्यास गेले आणि राजा नचिकेतला म्हणाला 'ये आणि नदीत आंघोळ कर. नंतर लोक आले आणि सांगू लागले की आग लागली आणि सर्व लोक पळू लागले. राजा जनक ध्यानस्थ होते आणि शांतपणे बसले हो. नचिकेत जरा काळजीत होता. नंतर तो म्हणाला आग इकडेच पसरत आहे आणि हे कपडे जळून जातीन. नचिकेत त्याच्या वस्तू वाचविण्यासाठी धावू लागला, पण तरीही राजा जनक ध्यानस्थ होते. नंतर नचिकेत आला व त्याला तेथे एकही वस्तू जळालेली दिसली नाही. तो फक्त लोकांचा भास होता. नचिकेत चकीत झाला. नंतर त्याला समजले आपले कुठे चुकते. तो ईश्वरी सत्तेबद्दल शंकीत होता. जनक हे राजे होते. त्यांना आपल्या शक्तीचा कधीच विचार नव्हता. कारण ती अशा प्रकारची होती आणि त्यांना ते दाखवायचे होते. जर माझे लग्न झाले आहे तर मंगळसूत्र घातले पाहिजे. ही परंपरा म्हणून जरुर आहे. ती चालीरिती आहे. परंतु ते अंतरात उच्च प्रतीचे संत होते. जेव्हा तुम्हाला एखादा अधिकार दिला जातो. तेव्हा हे घडते. जसे मला आश्चर्य वाटते सहजयोगात एखाद्याला प्रमुख बनविले तर त्याला काय होते कळत नाही. हा सगळा भ्रम आहे. सहजयोगात कसलं पुढारीपण तो सगळा भ्रम आहे बाकी काही नाही. पण अचानक लोक उड्या मारु लागतात. हा अहंकार वाढविण्याचाच प्रकार आहे. आणि तो दूर करण्यासठी तुम्ही राजलक्ष्मीचे पूजन केले

पाहिजे. ती तुम्हाला संतुलन देते. प्रथमतः हत्ती हे तिचे वाहन आहे. कुठल्याही स्त्रीला हत्तीवर आरूढ होणे सोपे नाही. पण मी ते केले आहे. हे न घाबरता करणे सोपे नाही. संतुलित दृष्टिकोन ठेवून ती अगदी ताठ बसते. तिचे अनंत आशिर्वाद आहेत. तिचा पहिला आशिर्वाद म्हणजे तुमच्यात प्रतिष्ठेचे रोपण होते. राजाची प्रतिष्ठा - राणी. ती जर राणी असेल तर एखाद्या वेताल स्त्रीप्रमाणे वर्तन करु शकत नाही.

तिच्या आशिर्वादाने तुम्हाला अशी प्रतिष्ठा लाभते जी प्रमाने ओथंबलेली असते, जी दुसऱ्याकरिता व्यक्त होणारे प्रेम असते. असे व्यक्तीमत्व फक्त प्रेम प्रक्षेपित करते आणि लोकांचे कल्याण साधते. ज्यांच्यावर तीची दृष्टि पडते ते आशिर्वादीत होतात. तिची दुसरी कुठलीही अपेक्षा नसते. तुम्ही राणीला काय देऊ शकता ? ती सर्व दृष्टीने परिपूर्ण आहे. तुम्ही तिला काय देऊ शकणार. सर्व राजकारणी लोक आणि ह्या सर्व राष्ट्राचे अध्यक्ष, ते सगळे लाचार आहेत. सतत मला हे द्या, ते द्या असे करत एखाद्या हावरट लोकाप्रमाणे करतात. असे लोक काहीच करु शकत नाही. असे व्यक्तीत्व तयार होते की जे लोकांना आशिर्वाद देणारे ठरते आणि त्यांचे कल्याण करणारे ठरते. आणि येणाऱ्या प्रत्येक माणसाची काळजी घेतात. हा या देवीचा आशिर्वाद आहे.

ह्या देवीचा दुसरा आशिर्वाद म्हणजे तुमच्यात उच्च प्रतीचा स्वभाव विकसित करणे आणि मोठ्या विनोद बुध्दीने इतर लोक कसे आहेत ते जाणू शकता. एका राजाची कथा आहे, तो घोड्यावरुन जात असताना त्याला एक दारुड्या भेटला, आपल्या राजकारणाशी त्या दारुड्याची आपण तुलना करु शकतो. तो दारुड्या त्या राजाला थांबवतो आणि म्हणतो "मला तुझा घोडा विकत पाहिजे". तेव्हा दुसरे लोक म्हणतात की अरे तुला तो राजा आहे हे माहीत आहे का ? "मला माहित आहे, तो राजा आहे, मला त्याचा घोडा विकत हवा आहे" राजा उत्तरतो "आज नाही पण तुला तो उद्या विकत देतो'. आणि राजा निघून जातो. दुसऱ्या दिवशी त्या माणसाला बोलवण्यात आले. तो माणूस वाकत आणि हात जोडत आला. राजा त्याला म्हणतो "तु माझा घोडा विकत घेणार होता त्याचे काय झाले ? मला तो तुला विकायचा आहे". तेव्हा तो माणूस म्हणाला "काल जो घोडा घेणारा होता तो मृत झाला. मी एक सामान्य माणूस आहे. असा एक प्रचंड व्यक्तीमत्व. दुसरा कोणी राजा असता तर रागावला असता आणि म्हणाला असता, 'ह्या माणसाला मारा आणि हाकलून द्या'. पण तो राजा अशा तऱ्हेने वागला. राजा जे बोलला ते वैशिष्ट्यपूर्ण होते कारण त्याला माहीत होते की तो माणूस नशेत आहे व शुध्दीत नाही. त्यामुळे तो म्हणाला 'तु उद्या ये मग मी तुला घोडा विकेन'. हे केवळ तुमच्यातील राजलक्ष्मी तत्वाशिवाय शक्य नाही. म्हणूनच तुम्ही असे वागू शकता. परंतु आजकालच्या राजकारण्याचे बघा. ते कोणाला गोळी घालतील, ठार मारतील व कैद करतील, सगळ्या गोष्टी ते करतात. अशा लोकांना दुसऱ्यांना गुन्हेगार म्हणण्याचा काही अधिकार नाही. पण हे आपण स्विकारतो, की सध्याचा जमानाच असा आहे आणि अशा लोकांना आपण आपले राज्यकर्ते म्हणून स्विकारतो.

राजलक्ष्मी जी आपल्या धर्माशी निगडीत आहे. एखादा अधर्मी असेल तर ती त्याला आशिर्वाद देत नाही. अधर्म काढून टाकावा लागतो. ती धार्मिक लोकांचे सर्व प्रकारे संरक्षण करते. पण एखादा अधार्मिक असेल तर त्याला नाही वाचविणार. अशा प्रकारचे ईश्वरी तारतम्य एखाद्याकडे असावे. जेणेकरुन एखाद्याला दया दाखवायची, का एखाद्याला शिक्षा करायची. तर माणसात असं ईश्वरी तारतम्य पाहिजे. नाहीतर तो भोवतालच्या लोकांच्या हातातले खेळणं बनेल. आणि तुम्हाला शिकवतील एक आणि करतील दुसरेच.

माझ्या आईच्या गावात नांदगाव येथे एक माणूस होता. त्याची योग्यांवर बरीच छाप होती. मी शांत राहिले. तो माणूस राजकारणी होता. तो माणूस मला सांगत होता आपण हे करायला हवे. मी म्हणाले ठिक आहे. नंतर ३ किंवा ४ विद्यापीठातले प्राध्यापक माझ्याकडे आले, मला म्हणाले "माताजी, तो माणूस राजकारणी आहे, जरा संभाळून रहा. तो अतिशय वाईट आहे. जरा संभाळून रहा". मी म्हणाले "तुम्हाला ह्या माणसाबद्दल काय माहिती आहे ?" ते म्हणाले "तो राजकारणी आहे" मग मी म्हणाले असे बरेच राजकारणी लोक आहेत. ते म्हणाले तो चांगला माणूस नाही. मी म्हणाले "आता बसा, मी तुम्हाला त्याच्याबद्दल सांगते. तो माणूस एका ब्राम्हण बाईबरोबर पळून गेला आणि तो स्वतः ब्राम्हण नव्हता. आणि हा त्याचा मुलगा आहे. आणि त्याने किती लोकांना

फसवले आहे ते मला माहित आहे". ते सगळे चकीत झाले. "आई तुम्हाला हे सर्व माहित आहे ?" मी म्हणाले "हो, मी त्याला जाणते". "मग तुम्ही त्याला तुमच्याकडे का येऊ दिले ?" मी म्हणाले "तुम्ही नाराज आहात. पण हे खरोखर चांगले झाले. तो माझ्याकडे आला कारण त्याने बऱ्याच लोकांना त्रास दिला आहे आणि मी त्याला आता ठिक करेन". काही लोक त्याच्याबद्दल विचार करत की त्याने बरेच काही मिळवले आहे., तर काही सांगत की त्याच्यापासुन जपून रहा आणि तेही त्याच्याजवळ काय आहे हे न जाणता. पण अशा ठिकाणी तारतम्य पाहिजे. जर राजाला ही बुध्दी नसेलतर तो सज्जनांना शिक्षा करेल आणि दुर्जनांना मदत करेल.

जेव्हा तुम्ही स्वार्थी होता तेव्हा हे तारतम्य नाहीसे होते. सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमच्या शक्तीशी तुम्ही निराबाधित असले पाहिजे. मग राजलक्ष्मीने कसली चिंता करायची ? काही लोक लोकांना बळजबरी करून सांगतात की हे असे आहे. आणि आपण जगात सर्वोच्च आहोत. ते फक्त स्तोम माजवतात. आणि राजकारण्यांचे स्तोम माजवतात. मग त्यांना असे वाटते आपण खुप मोठे आहोत. मग निवडणुकीनंतर आपण कशासाठी उभे राहीलो होतो हे त्यांना समजत नाही.

स्वतःबद्दलची प्रतिष्ठा आणि स्वतःचे ज्ञान असेल तर तुम्हाला समजते आपण कोण आहोत. तुम्ही मला काहीही सांगा, काहीही म्हणा. मी ते करेन. हा दिवा आहे. जर मी आदीशक्ती आहे, तर काय ? जर तुम्ही राजा आहात, राजा आहात, मग काय ? जर तुम्ही ढोंगी असाल तर तुम्हाला तुमचा अहंकार जाणवेल. पण तुम्ही खरोखर राजा असाल तर तुम्हांला ते जाणवणार नाही. जर तुम्ही देवीच्या कृपेत असाल तर ह्या गोष्टीचा तुम्ही आनंद घ्याल. बाकी हे सर्व काही नाही. मग तुमच्याकडे हिरे असोत, सोनं असो वा चांदी असो काही फरक पडत नाही.

आता आपल्याला हे समजले पाहिजे की लोकांनी ग्रंथांचा गैरवापर कसा केला ठिक आहे. राजलक्ष्मी घोड्यावर स्वार आहे, म्हणून ह्या लोकांकडे मोठ्या मोटारी आहेत.

ती हत्तीवर स्वार होते कारण तो सगळ्यात उंच प्राणी आहे. तो अतिशय क्षमाशील, दयावान आणि त्याची स्मरणशक्तीही बरीच आहे. म्हणुनच ती हत्तीवर स्वार आहे. ती तेथे दिखाऊपणा करण्यासाठी बसलेली नाही. ती उंचीवर सगळीकडे काय चालले हे बघण्यासाठीच बसलेली आहे. म्हणूनच राजाला उंच आसनावर बसवतात. त्या दिखाऊपणासाठी बसवलेले नसते. त्याचे कारण असे की त्या स्थितीवरून आपण दुसऱ्यांना चांगले समजू शकू, आपण दुसऱ्यांवर नजर ठेवू शकू. जर कोणाला बढती मिळाली तर ते ती जागा आपलीच आहे असे समजतात. हे सगळे जेव्हा तुमचा मेंदु उलटा होतो तेव्हा येते. हे तर्कशुध्द कसे असु शकते ? जर तुम्हाला सिंहासन दिले, तुम्ही त्याच्यावर बसा, पण हे सिंहासन तुम्हाला काही देणार नाही. राजाने नेहमी विचार करायला पाहिजे की तो ह्या सगळ्यांवर उपकार करतो का ? कारण तो राजा आहे. त्याने असा विचार करायला हवा की ह्या सर्व गोष्टी महत्वाच्या आहेत कारण त्याच्यामध्ये काहीतरी कमी आहे. म्हणून मग ते जेव्हा राज्य करायला लागतात तेव्हा निरुपयोगी अशा गोष्टी परिधान करतात. त्यांची प्रतिष्ठा, सर्वकाही केवळ शोभेच्या वस्तु असतात. आणि आम्ही राजे आहोत हे दर्शविण्यासाठी त्यांना मुकुट प्रदान केला जातो. गळ्यात घालण्यास माळा दिल्या जातात. आणखी काही गोष्टी धारण करतात कारण ते राजे आहेत. या गोष्टी त्यांची आभुषणे नाहीत पण राजाने धारण केल्यामुळे त्यांना शोभा येते. उदा. रस्त्यावरील एखाद्या उपटसुंभाला धरुन आणले जो अर्धपोटी उपाशी असा भिकारी आहे. आणि त्याला राजाचे सर्व अलंकार घाला आणि राजाचा पोषाख चढवा. आणि त्याला मंचावर उभे करा. हे पाहून प्रत्येकजण पोट धरुन हसु लागेल. कोणासही तो राजा वाटणार नाही. कारण त्याच्यात ती प्रतिष्ठा, तो चेहरा तसे शरीर तसे त्याचे विचार की शहाणपण नाही. तो कसा राजा बनु शकेल ? एक राजा होता. त्याने स्वतःसाठी रत्नजडीत जोडे केले. तो किती वेडपट होता. त्याचे जोडे पाहून माणुस असा कसा विचार करु शकतो ? त्याच्याकडे बघुन तो एकदम बावळट वाटत होता. आजच्या काळात अशा गोष्टी अनेक बावळट लोक करत असतात. मला त्याबाबत फारसे गम्य वाटत नाही. त्यांना या गोष्टींचे महत्व वाटते. त्यांच्याकडे ती नसेल तर विकत घेऊन ती धारण करतील. एकदा एक गृहस्थ गळ्यात हार घालून माझ्या कार्यक्रमात आले. मी विचारले की तुम्ही हा हार घालून का

फिरता ? लोकांनी मला हा हार घातला म्हणून मी तो तसाच ठेवला. आम्ही भारतीय कोणीही दिलेला हार घेत नाही. आणि हार घातला तर लगेच काढून ठेवतात याला अपवाद फक्त देवाचा . देवाला ते हार घालतील.

एक स्त्री माझ्याकडे आली आणि म्हणाली 'मला या भारतीयांबद्दल समजतच नाही. मी एक हार विकत घेतला आणि माझ्या गळ्यात घालून रस्त्याने जात होते , तर ते माझ्याकडे बघून हसत होते. पण तुम्ही भारतीयच यातील गम्यता जाणू शकता. तुम्ही कोणी देव नाहीत की घेतला एक हार घातला गळ्यात आणि निघाला. मूळतः तुम्ही ती व्यक्तीअसावी जी मूलतः राजा आहे , ज्याला राजलक्ष्मीचे आशिर्वाद आहेत. ती त्या व्यक्तीकरिता काय करते. ती काय करते ते म्हणजे ज्या लोकांवर तो राज्य करतो त्यांच्या हृदयावर त्याचे नाव कोरले जाते. ती स्वतःच्या हाताने ते लिहीते. लोक त्याची शोभा वाढवतात आणि त्याचे गुण आपल्या आत बिंबवतात.

राजलक्ष्मीचा दुसरा आशिर्वाद म्हणजे ती त्या देहाला एक गुणविशेषांक ज्यातून चैतन्य वाहते ते प्रदान करते. ती माणसे स्वार्थी नसतात , स्वतःबद्दल कधी जाहीरात करत नाही , स्वतःची टिमकी वाजवत नाही पण ते जिथे आहेत तेथेच असतात व दाखवू शकतात. आमच्या काळात असे बरेच लोक झालेत. कदाचित लोकांनी त्यांना स्विकारले नसेल, त्यांची नामोनिशानही नसेल नवीन तट्टू आता उड्या मारु लागले आहे. पण काही झाले तरी ज्यांची नावे लोंकांच्या हृदयात लिहली गेली ती ही माणसे होती ज्यांना या राजलक्ष्मीचे आशिर्वाद होते.

प्रत्येक राज्यकर्त्याने समजले पाहिजे की तो पैसे जमा करण्यासाठी नाही. त्याने त्याचा मोठा बाऊ करु नये. देशातून पैसे मिळवायचे असे त्याने काही करायचे नाही. त्याने त्याला त्रास देणाऱ्यांवर रागवू नये पण मग त्याने काय करायचे ? त्याने असे ऐकले पाहिजे की मी इकडे एक चांगला माणूस म्हणून आहे. त्यांने त्याच्या मरणानंतरच्या प्रसिध्दीची काळजी केली नाही पाहिजे. पण प्रत्येकाने आपल्या प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही असे बघावे. उदा. श्री राम हा कल्याणकारी राजा होता प्रश्नच नाही. पण कोणीतरी त्यांना आव्हान दिले की जर तुमची पत्नी रावणाकडे होती तर ती पवित्र कशी ? त्यांना माहित होते की सीता पवित्र आहे. तरी त्यांनी तिला पाठविले. त्यांनी तिला पाठवले कारण त्यांना त्यांची (आदर्श) राजाची प्रतिमा दाखवायची होती आणि त्यांनी तिला पाठवले. पण तुम्हाला आता असे दिसेल की कोणाचा तरी भाऊ किंवा बहीण अमेरीकेत असेल आणि त्याच्या काकाने मोठे घर बांधले , आईकडे जास्त पैसे नाहीत. मग सगळे म्हणतील तो फार पैसा पैसा करतो आणि आपला पैसा फालतू गोष्टीत खर्च करतो. आणि तो त्याचा दिखावा करतो. सगळेच असे म्हणतील पण त्याच्या तोंडावर त्याला कोणी असे म्हणणार नाही.

तुम्ही फक्त योग्य स्वभावाविषयी विचार करायला हवा. हा दुसरा मुद्दा की प्रत्येक राज्यकारण्याच्या मागे ३/४ पाठीराखे हवेत नाही तर तो राजकारणी नाही. जसे आपल्याकडे पूर्वी नवाब असत ज्यांना १६५ बायका होत्या. त्याने विचार केला मला जर १६५ बायका नसतील तर लोक मला नवाब स्विकारणार नाहीत. तुमच्यात हा दुसरा कमीपणा आहे की तुमच्याभोवती एकतरी स्त्री असावी. मग लोक आपल्याला म्हणतील की काय बलवान माणूस आहे हा , आता हे दिवस गेले आता सत्ययुग आहे. या सत्ययुगात हे निश्चीत समजा की ज्याला राजलक्ष्मीची कृपा नाही तो जेलमध्ये जाणार , त्याला आपली खूर्ची सोडावी लागणार , तो फेकला जाईल किंवा जसे लोक म्हणतात दोनदा मरेल तो धुळीला मिळेल. खरे तर त्यांचे पितळ उघडे पाडले पाहिजे , ज्या काही त्यांनी युक्त्या केल्या आणि जे काही परिणाम होतील ते त्याला भोगावे लागतील.

जी राणी सत्यवान आहे आणि जिला राजलक्ष्मीचा आशिर्वाद आहे ती लोकांच्या हृदयात वास करील. सत्ययुगात असे घडेल ही मला खात्री आहे. पण सहजयोगातही मला दिसते की लोक राजकारण करतात. मी चकीत होते. लोकांना राजकारण म्हणजे असे वाटते की गट करावे , इकडच्या गोष्टी तिकडे व तिकडच्या गोष्टी इकडे सांगाव्या. ते असे दाखवते की तुमच्यात सामुहीकता नाही. जो माणूस सहजयोगी असेल तो सगळ्यांना सामावून घेईल कारण त्याच्यात सामुहीकता असते. कोणत्याही गोष्टीसाठी सामुहीकता तोडणे हे त्या माणसाला तसेच इतरांनाही धोकादायक असते.

तर आता तुम्ही दैवीराज्यात प्रवेश केला. तुम्ही आता

सर्वशक्तीमान देवाच्या न्यायालयात बसला आहात. अर्थातच तुम्ही त्यातील एक आहात म्हणून तुम्हाला नीट बसले पाहिजे. नीट कपडे घातले पाहिजे, तुमची जागा घेतली पाहिजे. आपण नीटनेटके पाहिजे कारण आपण सहजयोगी आहोत. तुम्ही आता साधारण नाही तर कोणीतरी विशेष आहात. तुम्ही स्वतःला राजलक्ष्मीचे इतके सुंदर माध्यम बनवा की जेव्हा लोक तुम्हाला बघतील ते तुम्हाला मत देतील आणि तुम्ही जगावर राज्य कराल.

मला तुम्ही राजकारणात किंवा राजकारणाच्या बाहेर पडावे असे वाटत नाही. तर असे वाटते की तुम्ही प्रथमतः राजलक्ष्मीचा आशिर्वाद घ्या. तेव्हाच तुम्हाला आपल्या देशात काय चांगले काय वाईट ते समजेल. आपल्याला काय करावे लागेल कशासाठी करावे लागेल? आपण राजकारणात का आलो ? आपल्याला काहीतरी ठरवायला पाहिजे. आपले चित्त आपल्यापेक्षा दूर कोठे जाते. जसे मला काही लोकांची पत्रे येतात माझी आई आजारी, माझे वडील आजारी असे लोक काही करु शकत नाहीत.

आमच्या देशात जेव्हा स्वातंत्र्यलढा सुरु झाला तेव्हा आम्ही आमचे शिक्षण सोडले, मित्र सोडले, सगळे तरुण होते. आता जर तुम्हाला खरोखर राजकारणात जायचे असेल तर तुम्हाला राजलक्ष्मीचे आशिर्वाद हवेत आणि त्यासाठी तुम्हाला स्वतःला एक प्रतिष्ठीत आणि जाणकार बनले पाहिजे.

जेव्हा आपल्यात राजलक्ष्मीचे तत्व जागृत होते तेव्हा आपण पूर्णपणे बदलतो. आपले विचार स्वतःवरुन सामुहिक होतात. आपण स्वतःचे अस्तित्व विसरुन जगाशी एकरूप होतो. आपण स्वतःविषयी विचार न करता जगाचा विचार करतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल की मला काय पाहिजे याचा विचार मी करत नाही. किंवा माझ्यासाठी काय खरेदी करायचे याचा पण नाही. तुम्हीच माझ्यासाठी सर्व आणता. एकदा आमच्या घरातील सगळ्या वस्तू चोरीला गेल्या. सगळ्या साड्या चोरीला गेल्या आणि आम्ही बिकट परिस्थितीत सापडलो. माझे यजमान हे प्रतिष्ठीत सरकारी नोकर होते. आणि त्यांचे कपडे तयार करता करता माझी परिस्थिती बिकट होत होती. मग जवळजवळ ७ वर्षे मी फक्त एकच साडी वापरली. माझ्याकडे एक कॉटनची साडी होती पण जेव्हा जेव्हा मी बाहेर जात तेव्हा सिल्कची साडी वापरत होते. पण कोणालाही ते दिसले नाही. फक्त माझ्या यजमानांना माहीत होते. आता तुम्ही मला इतक्या साड्या दिल्यात की मला वाटते परत एकदा द्रौपदी वस्त्रहरण होईल आणि मी त्या साड्यांचा उपयोग करेन. नाहीतर मग साड्यांचे ढिगावर ढिग लागतील आणि मी त्या कोठे वापरेन ? पण कोणी ऐकत नाही. मी म्हणते मला कोणी भेटवस्तू देऊ नका, मला काही नको. ते म्हणतात "तुम्ही आम्हाला कुठलीही भेटवस्तू देऊ नका". पण मी म्हणते, "मी तुमची आई आहे मी दिले पाहिजे". पण तुम्ही ऐकत नाही. तुम्ही म्हणता आम्हाला हे देण्यात आनंद मिळतो. आता मला विचार करावा लागतो की तुम्ही मला काय देणार ? की मी ते सहयजोगाला देईन. त्याचा उपयोग काय ? मला ते नको. कृपा करून भेट देणे कमी करा. जेथे मी जाते तेथे मला भेटवस्तू देतात. जर कोणाला मुलगा झाला तर भेट, जर लग्न झाले तर भेट मिळतच चालले. माझी ३ बांधलेली घरे गोदामे झाली आता चौथे घर पण तेचहोईल. तेथे रहायलाही जागा नाही.

तुम्हाला आनंद मिळतो ठिक आहे. एक साडी वर्षाला ठिक. तुम्ही खूप प्रेम करता आणि मीही तुमच्यावर प्रेम करते. प्रेमात सगळ्यांनाच वाटते की आपण काहीतरी द्यावे. ह्या बाह्यातल्या गोष्टी फक्त तुमचे प्रेम दाखविण्यासाठी आहे. आता आजच्या जगाचा विचार करा. किती जग जवळ आलेआहे ते लोकांनी हा विचार करायला हवा. आता मी सगळ्यांशी बोलून कंटाळले. आता मध्य मार्ग धरा म्हणजे मग खूप छान होईल.

मी तुम्हाला हृदयापासून आशिर्वाद देते की प्रत्येक देशात असे लोक वर येवोत.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद.

卐

# महाकाली पूजा

## लोणावळा दि. १९ डिसेंबर १९८३.

## (इंग्रजी अनुवाद - निर्मला योग मार्च-एप्रिल १९८३)

आज प्रथमतः आपण सर्वांनी आपली इच्छा आपल्या मनामध्ये प्रस्थापित करावयास पाहिजे की आम्ही सर्व जण साधक असून आम्हाला आमची प्रगती करून प्रगल्भता मिळविली पाहिजे. आजची पूजा ही सर्व विश्वासाठी आहे. ह्या इच्छेने सर्व जग प्रकाशित झाले पाहिजे. तुमची इच्छा इतकी तीव्र असावी की , तिने महाकालीची म्हणजे आत्म्याला मिळविण्याच्या शुध्द इच्छेच्या चैतन्य लहरी सोडल्या पाहिजेत. ती खरी इच्छा , बाकी सर्व इच्छा मृगजळासारख्या आहेत. ईश्वराने तुम्हाला खास करून प्रथम इच्छा व्यक्त करण्यासाठी व नंतर त्या पावित्र्याची प्रखर इच्छा प्राप्त करून घेण्यासाठी निवडले आहे. तुम्हाला सर्व जगाला शुध्द करावयाचे आहे. फक्त साधकांना नाही तर जे साधक नाहीत अशांसाठी ज्याच्या पलिकडे काही नाही त्याला म्हणजे आत्म्याला मिळविण्याच्या इच्छेचे वलय तुम्हाला या विश्वाच्या भोवती निर्माण करावयाचे आहे.

इच्छेशिवाय हे विश्व राहिले नसते. ही परमेश्वरी इच्छा हीच आदिशक्ति होय. ही सर्वत्र पसरलेली शक्ती आहे. हीच ती आपणा सर्वांच्या ठिकाणी असणारी कुंडलिनी होय. कुंडलिनी फक्त एकच इच्छा आहे आणि ती म्हणजे आत्मा होय. या शिवाय असणारी कुठलीही इच्छा ठेवल्यास कुंडलिनी वर चढत नाही. कुंडलिनीला जेव्हा समजते की, ही इच्छा जिच्याकडून पूर्ण होणार आहे. अशी व्यक्ति साधकाचे समोर आहे. तेव्हाच ती जागृत होते. जर तुम्हाला इच्छाच नसेल तर कोणीच ती निर्माण करू शकत नाही. सहजयोग्यांनी आपली इच्छा कुणावर लादू नये.

तुम्हाला जागृती मिळाल्यावर लगेच पहिला अडथळा येतो ते म्हणजे तुम्ही प्रथम तुमच्या कुटुंबाचा विचार करता. तुम्ही विचार करावयास लागता की , माझ्या आईला ते मिळालं नाही , माझ्या वडीलांना ते मिळालं नाही , माझ्या बायकोला ते मिळालं नाही , माझ्या मुलांना ते मिळालं नाही , तुम्ही हे लक्षात ठेवलं पाहिजे की, ही नाती भौतिक आहेत, संस्कृतमध्ये त्याला लौकिक असा शब्द आहे. ते अलौकिक नाहीत, ते ऐहिक नात्याच्या पलिकडचे नाहीत. हे संबंध लौकिक आहेत आणि हे पाश ही लौकिकच आहेत. तेव्हा तुम्ही जर ह्या नात्यातच गुरफटला गेलात तर महामाया तुमचा हा खेळ चालू देते. तो तुमचा खेळ तुम्हाला हवा तेवढा चालू राहतो. लोक माझ्याकडे त्यांच्या नात्याच्या मंडळींना घेऊन येतात. सरते शेवटी त्यांच्या हेलक्षात येते की ही फार मोठी चूक त्यांनी केली. आपल्या आयुष्यातील अत्यंत मोलाचे क्षण , तास , वर्ष व शक्ती अशा लोकांवर वाया गेलेले आहेत की जे माताजींचे लक्ष वेधून घेण्यास अपात्र आहेत.

तुम्हाला जेवढ्या लवकर कळेल तेवढं बरं की तुमच्यात ही इच्छा असेलही आणि कदाचित तुमच्या लौकिक नात्याच्या लोकांत नसेलही परंतु त्याने काही फरक पडत नाही.

ज्यावेळी ख्रिस्ताला सांगीतले की तुमचे बंधू व भगिनी बाहेर थांबलेले आहेत , तेव्हा ख्रिस्त म्हणाले , "माझे बंधु कोण

? माझ्या भगिनी कोण ? तेव्हा लोकांनी हे जाणलं पाहिजे की जे आपल्या घरगुती कटकटीमध्येच अडकून पडतात आणि माझं लक्ष वेधू इच्छितात, तेव्हा तुम्ही हे लक्षात ठेवा की मी फक्त त्यांच्याशी खेळत असते. त्याचा त्यांना काहीच फायदा नाही. तुमच्या प्रगतीकरिता तुम्ही तुमच्या नात्यागोत्याच्या लोकांतील इच्छा काढून टाकली पाहिजे. ही फार महत्वाची गोष्ट आहे. महाकालीची शक्ति प्रस्थापित करण्यासाठी हे सर्वांत पहिले तत्व आहे. विशेषतः भारतातील लोक हे त्यांच्या कौटुंबिक जीवनात फार अडकलेले असतात आणि म्हणून तो फार मोठा प्रश्न होवून बसला आहे. जर तुम्ही एका व्यक्तिला जागृती दिली तर तुम्हाला आश्चर्य वाटेल की, तिचे सर्व नातेवाईक, भुतांचा समुदायच आहे. एकदा तुम्ही एका व्यक्तीला जागृती दिली की, तुम्ही अडचणीत पडतात, आणि सर्व भुतं हळूहळू पुढे सरतात आणि मला छळण्यासाठी प्रयत्न करतात. त्यात माझी शक्ति विनाकारण वाया जाते. आणि त्याचा तुम्हाला काही उपयोग होत नाही. तुम्हाला असे झाले म्हणजे कळेल की ही चांगली गोष्ट नाही. जर तुम्हाला वेळ वाया दवडावयाचा असेल तरा मी तुम्हाला वाया घालवू देईन. परंतू जर तुम्हाला तुमची उन्नती करावयाची असेल तर ही भौतिक नातीगोती असून ही काही शुध्द इच्छा नाही, हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजें.

तेव्हा तुमची शुध्द इच्छा ही भौतिक इच्छेपासून वेगळी करण्याचा प्रयत्न करा. ह्याचा अर्थ तमुम्ही तुमचे कुटुंब सोडा असा नाही. तुम्ही तुमची आई सोडा, बहीण सोडा असा नाही. परंतु तुम्ही इतर जणांना बघता तसेच त्यांना साक्षी स्वरूपात राहून पहा की खरोखरच त्यांना आंतरिक इच्छा आहे की नाही. ती असेल तर चांगलीच आहे. ती तुमच्या नात्याची मंडळी आहेत म्हणून काही त्यांना अपात्र ठरवायचे नाही. दोन्हींकडून ते लागू पडते. जसे ती नात्याची आहेत म्हणून लायक आहेत असे नाही. त्याचप्रमाणे त्यांना,, नात्याची आहेत म्हणून वाळीतही टाकू नये. सहजयोगात तुमची इच्छा, शुध्द इच्छा असली पाहिजे. तुम्हाला कित्येक गोष्टीमधून बाहेर पडायचे आहे. परंतु जे लोक कुटुंबात गुरफटलेले आहेत त्यांनी आपल्या नातेवाईकांवर सहजयोगाची जबरदस्ती करु नये. कमीतकमी त्यांना माझ्या डोक्यावर बसवू नये.

आता आपल्यातील ही इच्छा की जी महाकालीची शक्ति दृग्गोचर होत आहे, आपल्याकडे बऱ्याच मार्गांनी येत असते. जसं मी तुम्हाला पहिल्यांदाच सांगीतले की, तुम्हाला जागृती मिळाल्यानंतर तुम्ही सहयजोगी असल्यामुळे आपल्याला नातेवाईकासाठी काहीतरी करावे असे वाटणे. त्यांनंतर दुसरी इच्छा आपल्यामध्ये येते ती म्हणजे, आपल्या नातेवाईकांना बरे करावे. तुम्ही स्वतःला जाणून घ्या आणि तुम्ही बघाल की इतरांनाही तसेच वाटते. तेव्हा महारोगापासुन ते क्षुल्लक सर्दीपर्यन्त जो काही त्रास असेल त्यांना असे वाटते की, ते आईकडे आणावे आणि कुटुंबातील सर्व कटकटी माझ्यापर्यन्त आणतात. अत्यंत साध्या गोष्टी म्हणजे गर्भारपण किंवा साध्या शिंका, की ज्या अत्यंत नैसर्गिक असतात तुत्या तुमच्या चित्तात आणल्या जातात तर तुमच्या चित्तात जर त्या आहेत तर मी म्हणेन की, होऊ दे तुमचेच, बघा तुमचे प्रश्न सोडवता येतात कां ? पण जर तुमच्या चित्तात ते नसतील तर ते माझ्या चित्तामध्ये असतात. तुम्ही त्यांना माझ्यावर सोपवा. मी त्यांना बघून घेईन. पण हे दुष्ट चक्र आहे. मनातील अत्यंत सुक्ष्म विचार आहे की "ठिक आहे माताजी, आम्ही आमच्या चित्तातून काढून टाकलं, आता तुम्ही त्यांच्याकडे लक्ष द्या. परंतु हा काही मार्ग नाही. आपल्यात फक्त एकच तीव्र इच्छा असली पाहिजे आणि ती म्हणजे मी आत्मा झाला आहे कां ? मी माझे ध्येय गाठले आहे कां ? मी भौतिक इच्छावर मात केली कां ? स्वतःला शुध्द करा. एकदा का तुम्ही शुध्द करु लागला की जे काही गळून पडेल तिकडे लक्ष असते. हे फक्त आश्वासन आहे, पण खात्री नाही. जर ते माझ्या चित्तात येणे पात्र असतील तर त्याचेकडे मी बघेन. जसं मी माझ्या चित्ताला महत्व देते तसं तुम्ही पण महत्व दिलं पाहिजे. मला वाटतं की मी माझ्या चित्ताला महत्व देते त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त तुम्ही तुमच्या चित्ताला दिले पाहिजे. कारण बऱ्याचशा गोष्टी मी माझ्यातच घडवू शकते. कारण सर्व काही माझ्या चित्तात आहे.

पण तुम्ही मात्र तुमची इच्छा भौतिक कटकटीमधून

काढून शुध्द करण्याचा प्रयत्न करा. जेव्हा तुम्ही ती त्याच्याही पुढे न्याल तेव्हां तुम्ही विचार कराल, माताजी आपल्या देशाच्या अडचणीचे काय ? बरं, मग तुम्ही तुमच्या देशाचा नकाशा मजजवळ द्या म्हणजे संपलं. त्यात सर्व काही आलं. आता स्वतःला शुध्द करा. तुमची जी इच्छा असेल ती सोडून द्या. आणि तुम्ही एकदा का शुध्द झालात कि तो भाग तुमच्या चित्ताद्वारे व्यापला जाईल. हे फार समजून घेण्यासारखं आहे. तुम्ही जेव्हा त्याच्या बाहेर जाल तेव्हाच तुम्ही त्याच्यावर उजेडाचा झोत फेकू शकाल. पण तुम्ही त्यातच रहाल तर तो उजेड लपला जाईल. तेथे उजेड फाकणार नाही. तुम्हाला त्या इच्छेच्या पलिकडे गेले पाहिजे. तुम्हाला इच्छा झाली की, प्रत्येकवेळी तुम्ही तिचेवर मात करून जो तुमचा प्रश्न मी सोडवावा असे तुम्हाला वाटते, त्याचेवर तुम्हाला प्रकाश टाकता आला पाहिजे. ही सर्व माझी डोकेदुखी निष्कारण तुमच्यावर घेत आहात. तुम्हाला फक्त एकच गोष्ट करावयाची आहे. तुम्ही फक्त आत्मा बनले पाहिजे म्हणजे झालं. ही इतकी साधी गोष्ट आहे. बाकी सर्व माझी डोकेदुखी आहे.

आता तुमची सामुहिक इच्छा ज्या अडचणींकडे वळायला पाहिजे ती फार वेगळी असावी. तुमच्या शुध्दतेचा पाया मजबूत करण्यासाठी, शुध्दतेने सुगंधित होण्यासाठी तुमचे चित्त हे दुसऱ्या बाजूला असले पाहिजे. आता तुम्ही मला सामोरे नसून माझ्याबरोबर सर्व जगाला सामोरे गेलेले आहात हे लक्षात घ्या आणि मग सर्व प्रवृत्तीच बदलेल. तुमची प्रवृत्ती अशी असावयास पाहिजे कि "मी काय देऊ शकतो, कसं देऊ शकतो, माझ्या देण्यात काय चुका आहेत ? मला फार दक्ष रहावयास पाहिजे. माझे चित्त कोठे आहे ? मला माझ्या बाबतीत अधिक दक्ष रहावयास पाहिजे की मी काय करत आहे ? माझ्या जबाबदाऱ्या काय ? तुम्ही शुध्द असण्याची इच्छा ठेवली पाहिजे. तुमची शुध्द इच्छा असणे म्हणजेच आत्मा असणे. परंतु तुमच्या स्वतःबद्दल तुमची जबाबदारी काय ? तुम्ही अशी इच्छा केली पाहिजे की, तुमची स्वतःसंबंधीची जबाबदारी तुम्हाला कळावी आणि ती पूर्ण व्हावी. आता सहजयोगाबाबत तुमची काय जबाबदारी ? सहजयोग जे परमेश्वरी कार्य आहे ज्याला सुरुवात झाली आहे आणि तुम्ही माझे हात आहात. त्या सहजयोगात तुमची काय जबाबदारी आहे ? तुम्हाला परमेश्वरी कार्य करावयाचे आहे आणि परमेश्वराविरुध्द असणाऱ्या प्रवृत्तींशी सैतानी प्रवृत्तींशी तुम्हाला लढा द्यावयाचा आहे. पुढे तुम्ही तुमच्या कुटुंबाविषयी आता जबाबदार नाही. आणि जे आहेत ते अर्धवट सहजयोगी आहेत. मी तर म्हणेन की, ते अगदीच निरुपयोगी असून कामातून गेलेले आहेत. असे सर्व जण गळले जातील. त्यांच्या कुटुंबांनाही त्रास सोसावा लागेल. आणि मला माहित आहे की, ते असच घडणार आहे. कारण आता शक्तीअशा तऱ्हेने एकत्र येत आहे की, त्यातून निवडीला सुरुवात होईल. तुम्ही आत्मा बनला पाहिजे ही स्वतःबाबतची तुमची जबाबदारी आहे. सहयजोगाबाबतची जबाबदारी म्हणजे तुम्ही मला अधिकाधिक चांगल्या रितीने समजणे. तुमची जबाबदारी म्हणजे तुमच्यातीलच ही यंत्रणा समजावून घेणे व ती कशी काम करते, कशी वागते ते समजावून घेणे. तुमची जबाबदारी तुम्ही स्वतः गुरु बनणे. तुमची जबाबदारी एक भारदस्त व गौरवशाली व्यक्ती बनणे, एक क्षुद्र व्यक्ती न बनता एक आदरणीय व्यक्ती बनणे. जर तुम्ही तेवढ्या उंचीवर जाणार असाल तर तुमच्यापैकी प्रत्येकजण संपूर्ण विश्वाच्या मोलाचा आहे. तुमच्यामधील महत्ता वाढवून जर तेवढी उंची तुम्ही गाठणार असाल तर विश्वामागून विश्वे तुमच्या पायावर घालता येतील.

ज्या लोकांना अजूनही खालच्या पातळीवर रहावयाचे आहे ते कधीच प्रगती करु शकणार नाहीत. उदाहरणार्थ पश्चिमी सहजयोगीचे प्रश्न म्हणजे ते मातेविरुध्द पाप करतात तर पूर्वेकडील सहजयोगी पित्याविरुध्द पाप करतात परंतु ह्यातून तुम्हाला बाहेर पडणं काही कठीण नाही. चित्त शुध्द ठेवलं सहजयोगात स्वतःचे चित्त शुध्द ठेवण्याच्या सर्व पध्दती तुम्हाला माहित आहेत आणि जर चित्त शुध्द नसेल तर तुमच्या इच्छेवर अत्यंत क्षुल्लक व निरर्थक गोष्टींचा परिणाम होईल की, ज्याचा तुमच्या प्रगतीशी काहीही संबंध नाही. जो चांगला सहजयोगी असतो तो आपल्या कपड्याबाबत कोण काय म्हणजे, कोण त्याच्याशी कसा वागेल, याबाबत निःशंक

असतो. हा माणूस असा आहे , तो माणूस तसा आहे , असल्या टिकेवर त्याचे लक्ष असते. आणि आक्रमकता वगैरेचा प्रश्नच उरत नाही. कारण एक - दुसरा असा भावच उरत नाही. परंतु अडचण अशी आहे की मी जेव्हा हे म्हणजे तेव्हां मी हे तुमच्या प्रत्येकाविषयीच म्हणत असते असे कुणालाच वाटत नाही. जे चढाऊ वृत्तीचे आहेत ते आपल्याच वृत्तीने वागतात. तर जे मवाळ आहेत ते उलट विचार करतात. जसे मी जर एखाद्या चढाऊ वृत्तीच्या व्यक्तीबद्दल बोलले तर जे मवाळ लोक आहेत , ते त्याच माणसाविषयी विचार करतील. पण स्वतःविषयी नाही. तुम्ही तावडतोब तुमचे चित्त दुसऱ्या व्यक्तिवर नेता आणि दुसऱ्या लोकांच्या दोषावरच लक्ष ठेवता. म्हणून तुमची इच्छा अशा तऱ्हेने ओझे असल्याने कमी कमी होत जाते. तेव्हा जागृतता , संपूर्णपणे जागृतता म्हणजे सतर्कता असणे फार महत्वाचं आहे. म्हणजे आपण आपलं चित्त सतत आपली शुध्द इच्छा वाढविण्यावर ठेवलं पाहिजे. इच्छा ही तुमच्या ह्रदयातून येते आणि तुमची घडणच अशी आहे की , तुमचं ब्रम्हरंध्र हेही ह्रदयच आहे. जर तुमचं ह्रदय स्वच्छ नसेल तर ते स्वच्छ राहू शकत नाही. जे लोक सहजयोगाचा मोठेपणा सांगतात आणि सहजयोगाबद्दल मोठमोठ्या गोष्टी बोलतात ते सर्व ठीक आहे , परंतु जर त्यांचे ह्रदयच उघडे नसेल तर ते निव्वळ स्वतःची फसवणूक करीत असतात. स्वतःचे ह्रदय खुले करण्याचा प्रयत्न करा.

· मला आशा आहे की , जेव्हा तुम्ही ही पूजा करुन महाकालीची आराधना करुन व हा विशेष होम कराल तेव्हा आपण निश्चितच अशा तऱ्हेचं एक वलय प्रस्थापित करुन सर्व विश्वाला प्रकाशित करु शकू. परंतु ह्या कार्याला आपण कितपत सहभागी झालेलो आहोत हा दृष्टिकोन तुम्ही ठेवला पाहिजे. मी अजून दुसऱ्या विषयीच विचार करीत आहे काय ? मी माझ्या आत्म्याचा विचार करत आहे की अजूनही अत्यंत क्षुल्लक बाबींचाच विचार करत आहे.

तेव्हा डावी बाजू ही गणेशापासून सुरुवात होऊन गणेशातच तिचा शेवट होतो. श्री गणेशाचा फक्त मूलभूत एकच गुण आहे आणि तो म्हणजे गणेश हा पूर्णपणे आपल्या मातेला शरण आलेला आहे. त्याला इतर देवदेवता समजत नाहीत. त्याला स्वतःच्या पित्याबद्दल माहिती नाही. त्याला फक्त त्याच्या मातेची ओळख आहे आणि तो पूर्णपणे तिला शरण आलेला आहे. परंतु ही शुध्द इच्छा क्रियाशील झाली पाहिजे. त्याबद्दल मी जसजशा पूजा होत जातील तसे सांगेन. पण आज सर्वजण आत्मा होण्याच्या आपल्या शुध्द इच्छेमध्ये स्वतःला प्रस्थापित करु.

आता पश्चिमी मन म्हणेल की , हे कसे ? हे कसं करायचं , हा नेहमीच प्रश्न राहिलेला आहे. मी सांगू , ते अगदी सोपं आहे. आदि शंकराचार्यांनी विवेक चुडामणीचे लिखाण केले , पुष्कळ पुस्तकं लिहिली आणि त्या विषयीचा तत्वज्ञानावरही लिखाण केले आणि त्यांनंतर सर्व मोठ्या बुध्दीवादी लोकांनी त्यांच्यामागे त्यांना बेचैन केलं आणि त्यांना म्हणाले , "हे घ्या ते घ्या". तेव्हां शंकराचार्यांनी त्या लोकांचा नाद सोडला आणि नंतर त्यांनी फक्त त्यांच्या मातेचे वर्णन व तिच्याविषयी भक्तीचे वर्णन करणारे सौंदर्यलहरीचे लिखाण केले. त्यांनी लिहिलेला प्रत्येक श्लोक मंत्र आहे. शरणागती ही फक्त मनाची किंवा तुमच्या मनातून आलेली नाही तर ती ह्रदयापासून शरणागती आहे. ही अगदी ह्रदयाची शरणागती आहे. पश्चिमेकडील सहजयोग्यांना माहीत आहे की , त्यांच्यावर घातक प्रवृत्तीचे हल्ले कसे एकामागून एक झाले , विशेषतः जेव्हा फ्रॉईड सारखा भयंकर माणूस त्यांची पाळमुळं उखडून काढण्यासाठी आला. पश्चिमी लोकांनी ते डोळे मिटून स्विकारले आणि शेवटी त्यांना नरकाच्या वाटेवर सोडले. हे सर्व आता बाहेर काढावं ते सर्व मूर्खपणाच असून ह्या सर्व परमेश्वर विरोधी कारवाया आहेत. मग तुम्हाला कळेल की , आता ह्याला जोमाने लढा दिला पाहिजे आणि म्हणाल " हा आमच्या मूलभूत तत्वाचा नाश आहे. जर आमची आई सर्व महान उदात्त पोषक आणि उन्नत व मुक्त करण्याचा उगम आहे. आणि तुम्ही आम्हाला आमच्या मुळापासून तोडत आहात". तुम्हाला, मला वाटले, जनावरांप्रमाणे वागवण्यात आलेलं आहे आणि त्याला आपण सर्वजण इतक्या खालच्या पातळीवर म्हणजे अगदी जिवाणू सारख्या जगणाऱ्या

माणसांसारखे झालेले हवे आहे. तेव्हां तुम्ही तुमच्यावर झालेले सर्व हल्ले समजणे अत्यंत महत्वाचे आहे. आणि तुम्ही अत्यंत जागृत राहून त्यांच्याशी संबंध ठेवू नये.

सरतेशेवटी मी असं सांगेन की , तुम्ही ह्या देशात वरची टोकं नसून खोलवर गेलेली मुळं बघण्यासाठी आलेले आहात. तुमची पश्चिमी स्वप्न वृत्ती बदला , टेलिफोन चांगले नसून तुम्हाला एकहि टेलिफोन करता येणार नाही. टपाल व्यवस्था अगदीच भयंकर आहे , आणि रेल्वे खराब आहेत. (मी हे म्हणावयास नको , कारण आपणण रेल्वेच्याच बंगल्यात रहात आहोत.)

परंतु येथील लोक मात्र फार चांगले आहेत. त्यांना धर्म काय माहित आहे. हे कुंडलिनीचे स्थान असल्यामुळे आणि प्रत्यक्ष श्री गणेशच याठिकाणी बसलेले असल्यामुळे त्यांच्यावर कसल्याही प्रकारचे हल्ले झालेले नाहीत. ह्या महाराष्ट्राला अष्टविनायकांचं संरक्षण असताना कुणाला ह्याच्यावर हल्ले करण्याची काय छाती आहे. मला माहित नाही कि , महाराष्ट्रीयन लोकांना याची कल्पना आहे की नाही. शिवाय याठिकाणी कितीतरी मारुती आहेत , तेव्हां त्यांच्यावर कोण हल्ले करणार ? याठिकाणी कोणत्याही दुष्ट प्रवृत्तीचा प्रभाव नाही. फक्त हे लोक स्वतःच जरा पैशाच्या मागे लागलेले आहेत आणि हाच त्यांना एक श्राप आहे जर ते त्यातुन बाहेर पडतील तर ते अत्यंत महान लोक होतील.

तेव्हा तुम्ही या देशात पाश्चिमात्य सुख भोगावयास आलेले नाहीत. तर आत्म्याचं सुख जाणणार आहात. तुम्ही भारताबद्दलचे तुमचे विचार बदला. मी एअर इंडिया बद्दल बिलकुल म्हणत नाही. तुम्ही सहजयोगी म्हणून तुम्ही एअर इंडियानी यावं हा समज चुकीचा आहे. सहजयोगीशी एअर इंडियाचा काहीही संबंध नाही. रेल्वेचा किंवा इतर कशाचाही सहजयोगीशी संबंध नाही. तेव्हां कृपा करून तुम्ही देशाभिमानी राहून आपलीच एअर लाईन वापरा , तुम्ही इथे आल्यानंतर तुम्हांला असं दिसून आलं असेल की येथील लोक अत्यंत निरागस आहेत त्यांना फ्राईड समजू शकत नाही. तुम्ही त्यांच्याशी या विषयावर बोलू शकत नाही कारण ते त्यांना समजत नाही. याबाबतीत ते जरा वरच्या दर्जाचे आहेत. कारण त्यांच्यावर कुणी हल्ले केलेले नाहीत. एका दृष्टीने तुम्ही त्यांच्याही पेक्षा श्रेष्ठ आहात कारण तुमच्यावर जरी हल्ले झालेले असले तरी त्यातून तुम्ही बाहेर आलेले आहात. तुम्ही फक्त तुमची दृष्टि वळवाआणि तुम्ही दुसऱ्या तडीवर जाल , ही फार महान गोष्ट आहे. तेव्हां तुम्हाला एक प्रकारचा आधार पण वाटेल की या मोठ्या देशात तुमच्या सारखाच विश्वास आणि श्रध्दा असणारे अनेक लोक आहेत. म्हणून तुम्ही आचंव्यात पडू नका.

अशा तऱ्हेने आज आपल्याला महाकाली तत्वाची पूजा आरंभ करायची आहे. आजचा दिवस गौरीचा आहे. किंवा गौरी गणेशाचा आहे. जरी पंचांगाप्रमाणे तो नसला तरी माझ्या सांगण्याप्रमाणे आपण आपल्या मध्ये अत्यंत सूक्ष्मतेत त्याला प्रस्थापित करुया. इच्छा शुध्द असली पाहिजे आणि आपल्यामधील अनेक अडथळे धुवून टाकले पाहिजेत.

आपण अत्यंत महान सहजयोगी होण्याची इच्छा करा , आपण एक जबाबदार सहजयोगी होण्याची इच्छा करा. आपण एक आपल्या मातेला पूर्णपणे शरण जाण्याची इच्छा करा. हे काही कठिण नाही. अहंकारच शेवटी जातो. कारण नाहीतर तुम्ही शरणागति कसली करणार ? तुम्ही माझं प्रेम संपादण्यापेक्षा मला तुमच्याकडून अधिक काही नको. तुमचं हृदय उघड करून माझं प्रेम संपादा हाच शरणागतीचा अर्थ होय. अहंकार सोडा म्हणजे झालं. इतर कार्य सहज होईल. मी तुमच्या हृदयात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत आहे. आणि मी अवश्य तेथे स्थिर होईन.

जय श्री माताजी निर्मला देवी नमो नमः

# शिवपूजा

**श्री माताजींनी शिवपुजेला पंढरपूर येथे**
**दि. २९ फेब्रुवारी १९८४ रोजी दिलेला संदेश**
**(इंग्रजीचा मराठी सारांश)**

आजकालच्या जगात जे स्थान तिर्थक्षेत्र म्हणून पवित्र मानले जाते तेच अपवित्र होऊन जाते. परिस्थिती इतकी उलटसुलट झालेली आहे की, ज्यावेळी आपण काहीतरी मूलभूत तत्त्व रुजवू इच्छितो तेव्हा ते जणू काही एखाद्या खडकात रोवलेल्या बिजांनी डोकं वर काढण्यासाठी झगडावं तसे होते. तेव्हा आपण आपली बुध्दी शाबूत ठेवून अत्यंत शांत चित्ताने आणि सूज्ञपणे अशा परिस्थितीत काय मिळवू शकतो हे बघितले पाहिजे. ही फार महत्वाची बाब आहे.

आजचा दिवस माझ्या मते आपणा सर्वांकरिता फार मोठा दिवस आहे. कारण पंढरपूर हे ठिकाण विराटच आहे. विठ्ठलाच आहे. ह्याठिकाणी आपल्या भक्ताला (पुंडलिकाला) भेटण्यासाठी विठ्ठल अवतीर्ण झाले होते. आणि ज्यावेळी पुंडलिकाने त्यांना विटेवर उभे राहाण्यास सांगीतले होते त्यावेळी ते त्यावर उभे राहिले आणि असे म्हणतात की, अजुनही ते त्यावर उभे आहेत. काही लोक असे म्हणतात की, ज्या मूर्ती आपण बघतो त्या धरणीमातेतून ह्या वळवंटात वर आलेल्या आहेत. पुंडलिक त्या बरोबर घेऊन आला आणि सांगीतले की, ह्याच त्या मूर्ती की ज्या मला व माझ्या मातापित्यांना भेटण्यासाठी आलेल्या होत्या. मी त्यावेळी माझ्या मातापित्यांची सेवा करण्यात गुंतलो असल्यामुळे मी फेकलेल्या विटेवर त्या उभ्या आहेत. आता ही सर्व गोष्ट अगदी सूज्ञपणे सारासार विचार करून बघावयास पाहिजे की, परमेश्वर हा सर्व तऱ्हेचे चमत्कार करण्यास समर्थ आहे. परमेश्वरानी घडविलेले आपणही काही गोष्टी करतो तेही चमत्कार वाटतात. जर आपण १०० वर्षापूर्वीची या जगातील परिस्थिती बघीतली तर आज पुष्कळच गोष्टींबद्दल चमत्कार बघत आहोत असे आपण म्हणू शकतो. या दूरच्या स्थळी आजची ही व्यवस्था होऊ शकेल म्हणून ईश्वराच्या सर्व चमत्कारांचे विवरण करता येईलच असे नाही व तसे करूही नये. आपल्याला याची १०० वर्षापुर्वी जरासुध्दा कल्पना नव्हती. परंतु हे सर्व चमत्कार, परमेश्वर शक्तीचेच आहेत. याचा अर्थ आपण अत्यंत लहान अगदी अंशात्मक असे चमत्कार करणारे आहोत. मनाच्या पलिकडचे आहोत. परमेश्वर काहीही करु शकतो. तो सर्व तीनही क्षेत्रात तसेच चौथ्याही क्षेत्रात परिभ्रमण करु शकतो व वाटेल ते करु शकतो. तुम्ही रोजच्या व्यवहारात सुध्दा कित्येक चमत्कार घडतात ते पाहिले आहेत. ते कसे घडतात ते तुम्हाला समजू शकत नाही. निर्जीव वस्तुवरही त्याचा प्रभाव पडू शकतो आणि लोकांना त्याचे आश्चर्य वाटते तेव्हां हे सर्व बघून आपल्याला परमेश्वरावर विश्वास ठेवावाच लागतो की तो परमेश्वर आहे आणि त्याला जसं वाटेल तसे तो करु शकतो. आपण काहीच नाही. परमेश्वराचे हे चमत्कार समजण्यासाठी तार्किकता असु नये. हे कसे होऊ शकते, हे कसे असेल याचे तुम्ही स्पष्टीकरण देवू शकत नाही. जेव्हा तुम्ही मनाच्या त्या अवस्थेत पोहोचाल तेव्हां तुम्ही परमेश्वर हा सर्वशक्तिमान आहे यावर विश्वास ठेवाल. परंतु हे फार कठीण आहे. आपण लोक मर्यादित असल्यामुळे परमेश्वर सर्वशक्तीमान कसा आहे हे आपणांस समजू शकत नाही. हा परमेश्वर की ज्यांनी आपल्याला निर्माण केले, जो आपला पालनकर्ता आहे, आपले अस्तित्व रहावे, अशी ज्याची इच्छा आहे आणि जो प्रत्यक्षात आपले अस्तित्वच आहे तो परमेश्वर सर्व शक्तीशाली आहे. त्याला जे करण्याचे असेल ते तुमच्या बाबतीत तो करु शकतो. तो दुसरं विश्व निर्माण करु शकतो. तो ह्या विश्वाचा नाश करु शकतो. हा त्याच्या फक्त इच्छेचा खेळ आहे.

शिवपुजेसाठी पंढरपुरात घेण्यामागची माझी कल्पना अशी की, शिव हा आत्म्याचा प्रतिक आहे आणि तो आत्मा हा सर्वांच्या ठिकाणी हृदयात असलेला आहे. सदाशिवाचे स्थान हे तुमच्या मस्तकावर आहे. परंतु त्याचे प्रतिबिंब हे तुमच्या हृदयांत आहे. तुमचा मेंदू हा विठ्ठल आहे तेव्हा आत्म्याला तुमच्या मेंदूत आणणं म्हणजे तुमचा मेंदू प्रकाशित करणे. त्याचा अर्थ परमेश्वराला प्राप्त करुन घेण्याकरितां तुमचा मर्यादित मेंदू प्रकाशित होऊन तुमच्या मेंदूची कुवत, त्याची शक्ति अमर्याद होणे याचा अर्थ तुमचा मेंदू प्रकाशित करणे असा आहे. परमेश्वराचा साक्षात्कार करुन घेणे, ह्याला मी 'समजणे' हा शब्द वापरणार नाही तो किती शक्तीमान आहे ! किती महान आहे !! किती अद्‌भूत आहे ! दुसरी गोष्ट अशी की मनुष्याचा मेंदू हा निर्जीव वस्तूपासून निर्मिती करु शकतो. पण जेव्हां आत्मा मेंदूमध्ये शिरतो तेव्हा तो जिवित गोष्टी निर्माण करू शकतो. कुंडलिनीचे जिवीत कार्य एवढेच आहे पण निर्जीव वस्तुसुध्दा सजीवाप्रमाणे वागू शकतात. कारण तुम्ही निर्जीवातील आत्म्याला स्पर्श करता. ज्याप्रमाणे प्रत्येक अणूशक्तीतील केंद्रबिंदू किंवा कणामध्ये सुध्दा त्या अणूचा आत्मा असतो. जेव्हां तुम्ही तुमचा आत्मा बनता तेव्हा तुम्ही निर्जीवातील आत्म्याला स्पर्श करता. तुम्ही असं म्हणा की, अणुशक्तीतील मेंदू म्हणजेच त्याचा केन्द्रबिंदू परंतु अणूशक्तीला ताब्यात ठेवतो तो त्याचा आत्मा जी जो त्या केन्द्रबिंदूत विसावलेला असतो. तर, संपूर्ण अणू म्हणजे त्याचे शरीर हे चित्र झाले. त्याला केन्द्रबिंदू आहे. हा केन्द्रबिंदू आत्म्याच्या आंत आहे. त्याचप्रमाणे आपले शरीर आहे. त्याला चित्र आहे आणि केन्द्रबिंदू आहे. केन्द्रबिंदू हा मेंदू आहे आणि आत्मा हा हृदयात आहे. तेव्हां मेंदू हा आत्म्याकरवी ताब्यात ठेवला जातो. कसं ते पहा हृदयाच्या भोवती सात वलयं आहेत, ती कितीही वाढू शकतात. सात सात असे सोळा हजार वेळा गुणाकाराइतके वाढू शकतात, की जे या सात चक्रावर दृष्टि ठेवून सोळा हजारापर्यन्त शक्ति वाढवू शकतात. आता हा आत्मा या वलयामधून तुमच्या मेंदूचे निरीक्षण करीत आहे, लक्षात ठेवा, निरीक्षण करीत आहे. तो मेंदूतील तुमच्या सात चक्राचे निरीक्षण करीत आहे. तो मेंदूतील सर्व नसांचेही निरीक्षण करीत आहे पण जेव्हा तुम्ही आत्म्यालाच मेंदूत आणता तेव्हां तुम्ही दोन पावलं अधिक पुढे जाता. कारण जेव्हा तुमची कुंडलिनी जागृत होते तेव्हां ती सदाशिवाला स्पर्श करते व सदाशिव ते आत्म्याला कळवितो. म्हणजे आत्मा प्रतिबिंबित होतो.

तेव्हां पहिली अवस्था ही की निरीक्षण करणारी ही सात वलये तुमच्या मेंदूतील चक्राशी संपर्क साधतात आणि ती एकात्म करतात. पण जेव्हां तुम्ही आत्म्याला मेंदूत आणता ही दुसरी अवस्था होते. तेव्हा तुम्ही खऱ्या अर्थाने पूर्णपणे आत्मसाक्षात्कारी होता. कारण, तुमचा आत्मा हाच तुमचा मेंदू होतो. ही क्रिया फार Dynamic आहे. ती मानवात पाचवे नक्षत्र (dimension) उघडते.

प्रथमतः तुम्ही जेव्हा जागृत होऊन सामुहीक चेतनेत येता आणि कुंडलिनी चढवू शकता तेव्हा तुम्ही चौथे क्षेत्र ओलांडता. जेव्हा तुमचा आत्मा मेंदूत येतो तेव्हा तुम्ही पाचवे क्षेत्र बनता. म्हणजे - तुम्ही कर्ते बनता. उदाहरणार्थ, जेव्हा आपला मेंदू हा माईक उचलावयाला सांगतो तेव्हा त्याला तुम्ही स्पर्श करता व उचलता. याठिकाणी तुम्ही कर्ता होता पण जेव्हा मेंदूच आत्मा बनतो तेव्हा आत्मा हा कर्ता बनतो आणि जेव्हा आत्मा हा कर्ता होतो तेव्हा त्या तुम्ही गुंतले जात नाही. तुम्हाला कुठल्याच गोष्टींविषयी आसक्ती राहात नाही. तुमच्याजवळ असणाऱ्या एखाद्या गोष्टीची तुम्हाला आसक्ती वाटत नाही आणि वाटू शकतच नाही. कारण आत्मा हा पूर्णतया निरासक्त आहे. तुम्हाला कशाचीही आसक्ती प्रेम रहात नाही. क्षणभर सुध्दा तुम्ही आसक्त नसता.

आता आत्म्याची निरासक्ति समजण्यासाठी आपण आपल्या स्वतःचा अगदी प्रांजळपणाने अभ्यास करावयास हवा की आपण कसे गुंतलो जातो ? कारण आपण आपल्या मेंदूमुळे आसक्त होतो. कारण आपले सर्व संस्कार मेंदूतच साठवले जातात. आणि आपला अहंकारही मेंदूतच असतो. तेव्हा सर्व भावनात्मक बंधने ही सर्व मेंदू द्वारे होतात आणि आपल्या अहंकारातून निर्माण झालेली बंधनेही मेंदूद्वारे निर्माण होतात. तेव्हा असे म्हटले जाते की, जागृतिनंतर निरासक्त राहून शिवतत्व अंगीकारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. आता तुम्ही ही निरासक्तता कशी बाणवून घ्याल? कारण आपण आपल्या मेंदूद्वारे अर्थात चित्ताद्वारे काही गोष्टींच्या प्रेमात असतो तेव्हा आपण चित्ताला काबूत ठेवायचे म्हणजे "चित्तनिरोध" अंगिकारावा. म्हणजे चित्त कोठे जात आहे इकडे लक्ष ठेवावे. सहजयोगात तुम्हाला तुमची प्रगती करावयाची असल्यास तुमची स्वतःची यंत्रणा सुधारावयास हवी. दुसऱ्याची नाही ही एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवावयास पाहिजे. आता तुम्ही

फक्त तुमच्या चित्तावर लक्ष ठेवा, ते कुठे जात आहे ? स्वतः लक्ष ठेवा. जसं जसं तुम्ही स्वतः आपल्या चित्ताच निरीक्षण करावयास लागाल तसं तसं तुम्ही आत्म्याशी एकरूप होऊ शकाल. कारण जर तुम्हाला चित्ताचं निरीक्षण करावयाचे असेल तर तुम्हाला तुमचा आत्मा व्हावा लागेल. नाहीतर तुम्ही कसे निरीक्षण कराल ?

तेव्हां तुम्ही बघा, तुमचं चित्त कुठं जात आहे. सर्वप्रथम तुमची आसक्ती स्थूल गोष्टीवर म्हणजे शारीरिक आहेत. शिवाला शरिराची आसक्ती नाही तो कुठेही झोपणार. तो स्मशानात जाऊन झोपणार कारण कशाचंच प्रेम नाही. तो भुतपिशाच्चांनी पछाडत नाही किंवा कशानींच नाही. तो अगदीच मुक्त आहे. तुमच्या निरासक्ततेतून तुम्ही तुमच्या आसक्तीचे निरीक्षण करावयास पाहिजे.

आता तुमचा आत्मा जरी मेंदूत शिरला नसला, परंतु तुम्ही जागृत आहात तेव्हा काय करायला पाहिजे की कमीत कमी तुमच्या चित्तावर लक्ष ठेवा, तुमचं चित्त कुठं जात आहे हे अगदी स्पष्टपणे निरखू शकता, चित्ताला आवरण म्हणजे ह्या गोष्टीतून लक्ष काढून त्या गोष्टीकडे वळण तुमच्या आयुष्यातील गोष्टीचे प्राधान्य बदला. हे सर्व तुम्ही जागृत झाल्यानंतर करावयास पाहिजे. अगदी पूर्णपणे सर्व बंधनातून मुक्त व्हावयास पाहिजे. शरिराला आराम पाहिजे तर तो कमी करा. त्यामुळेच तुम्ही लोक हिमालयात जात असत. ह्या पंढरपुरात येण्यासही कितीतरी अडचणी आल्या तेव्हा हिमालयात जाण्याची कल्पना करा. तेव्हा जागृतीनंतर ते त्यांचं हे शरीर हिमालयात नेत असत आणि शरिराला ह्या सगळ्या अडचणीतून नेवून एक प्रकारची तपश्चर्या करीत असत. त्याचप्रमाणे तुम्ही ही तपश्चर्या केली पाहिजे. शरिराची सुखलोलुपता आता हळूहळू कमी करावयास पाहिजे. शिवाला तो कैलासात असला काय किंवा स्मशानातत असला काय किंवा कुठहि असले तर त्यांना सर्व सारखेच.

तुमचं चित्तं कुठं आहे ? मानवी चित्त हे अगदीच टाकाऊ आहे. फारच गुंतलेले व मुर्खपणाच आहे. "हे केलं का ?" तर ते यासाठी. अशा तऱ्हेचं कारण सर्वाला असते. तेव्हा कुठलंच स्पष्टीकरण देण्याची जरुरी नाही किंवा विचारण्याची जरुरी नाही. स्पष्टीकरणाशिवाय रहाणे अत्यंत चांगली गोष्ट आहे. साध्या हिंदीत म्हणायचं झालं तर "जैसे राखवू तैसेहि राहू", ज्या स्थितीत मला ठेवशील त्या स्थितीत मी आनंदानी राहीन. पुढे याच कवितेत कबीरांनी सांगीतले आहे की, तू मला हत्तीवर जावयास लाव, मी जाईन. जर पायानी चालवला लावलं तरी चालेन. "जैसे राखहू तैसे ही रहूं". तेव्हा कोणचीही प्रतिक्रिया नाही. प्रथम स्पष्टीकरण नाही आणि आता प्रतिक्रिया नाही. दुसरे खाण्याबाबतचे. खाण्यात अजिबात चित्त असता कामा नये. जनावराप्रमाणेच मानवाचे सुध्दां प्रथमम लक्ष खाण्यात. तसं पाहता सकाळी काय खाल्लं हेही लक्षात असू नये. परंतु आपण उद्या काय खाणार याचा विचार करतो. आपण अन्न हे शरीर चालविण्यासाठी खात नसून जिभेच्या स्वादासाठी खातो. एकदा का तुम्हाला कळलं कि भोग विलास हा अत्यंत स्थूल, अगदी स्थूल स्वरूपाचे चित्त आहे कि कळेल की कुठल्याहि प्रकारचा भोगविलास हा अगदी हीन प्रकारचे फक्त, फक्त इंद्रियांना होणारे सुख आहे. इंद्रियलोलूप आहे. अतिवश वरवरचे आहे. परंतु जेव्हा मी म्हणते की सुख नको, याचा अर्थ तुम्ही गंभीर होऊन जणूकाही सुतकांत आहात असे होता, असे नसावे. परंतु तुम्ही शिवासारखे झालं पाहिजे. तितके निरासक्त !

शिवजी अत्यंत जोरात धावत असलेल्या नंदीवर बसून त्यांच्या लग्नाला आले. नंदीवर ते दोन्ही पाय एका बाजूस सोडून बसले होते व नंदी अत्यंत जोरात धावत होता. त्यांनी त्याला धरुन ठेवले होते. त्यांचेबरोबर कुणाला नाक नाही तर कुणाला डोळा नाही अशा तऱ्हेचे अत्यंत विचित्र लोक होते. त्यांची पत्नी पार्वती मात्र अत्यंत ओशाळली. कारण सर्व लोक शिवाच्या विचित्रपणाच्या वागण्याबद्दल बोलत होते. परंतु शिव मात्र निःशंक होते. त्यांच्या प्रतिष्ठेबद्दल त्यांना जराही तमा नव्हती परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्ही हिप्पी व्हावं. हाच मोठा प्रश्न आहे. एकदा का तुम्ही त्या विचारात गेलात कि तुम्ही हिप्पी होता. बऱ्याच लोकांत असा विश्वास आहे की शिवासारखे वागले की तुम्ही शिव होता. बरेच लोक असे समजतात की, तुम्ही गांजा घेतलात की तुम्ही शिव होता. शिव गांजा घेत होते. कारण त्यांना सर्व जगातून तशा प्रकारच्या गोष्टी नष्ट करायच्या होत्या. गांजा असो की काहीही असो, त्याचा प्रश्न कोठे येतो ? काहीही दिलेतरी त्यांना नशा येत नसे, प्रश्नच उरत नाही. शिव कुठल्याही गोष्टीला बांधील नव्हते. त्यांना असे वाटते, शिवासारखे राहिले की शिवासारखे होता येते. ते प्रत्येक बाबतीत निरासक्त होते. स्वतःचे दिसण्याबद्दल त्यांना अजिबात

पर्वा नव्हती. ते जैसे दिसत होते तसेच सुंदर होते. शिवाला काही करण्याची आवश्यकता नव्हती. तेव्हां कुठल्याही गोष्टीला चिकटून राहणे हे कुरुपतेचे लक्षण आहे. मुर्खपणा आहे. तुम्ही पाहिजे तसा पेहेराव करू शकता. आणि जरी तुम्ही अत्यंत साध्या पेहेरावात असलात तरी सुध्दा तुमची भव्यता दिसू शकते परंतु जर तुम्ही असे समजलात कि ठीक आहे मग अशा परिस्थितीत एकच चादर गुंडाळून वावरू या, तर ते तसे नाही. तुमच्या आत्म्यातून तुमच्यात निर्माण होणारे सौंदर्य तुम्हाला जी शक्ती देते की त्यामुळे जो काय पेहेराव कराल त्यांनी तुमच्या सौंदर्यात काहीच फरक पडणार नाही व ते सौंदर्य कायम राहील. परंतु तुम्ही ती स्थिती गाठली आहे का ? ज्यावेळी तुमचा आत्मा तुमच्या मेंदूत शिरतो तेव्हाच ती स्थिती तुम्ही मिळवू शकता. अहंकारी लोकांच्या बाबतीत ते फार कठिण आहे. आणि म्हणूनच ते कशाचाहि आनंद उपभागू शकत नाहीत आणि येवढ्या तेवढ्या कारणांनी ते कोलमडून पडतात आणि आनंदाचा उगम जो आत्मा जो प्रगट होत नाही, येत नाही आनंद हेच सौंदर्य आहे. परंतु ती अवस्था मिळवावी लागते. आसक्ती ही अनेक मार्गांनी येते. आसक्ती थोडीशी जरी ठेवली तरी लगेच येते, तुमच्या कुटुंबाचे प्रेम, माझ्या मुलांचे काय होईल, माझ्या नवऱ्याचं काव होईल, माझ्या आईच काय होईल ? माझ्या बायकोचं काय होईल ? हे आणि ते अगदी मुर्खपणा आहे. तुमचे वडील कोण आणि आई कोण ? तुमचा नवरा कोण व तुमची बायको कोण ? शिवाना या गोष्टीच माहीत नाहीत. ते आणि त्यांची शक्ति अविभक्त आहे. तेव्हा शिव हे एकच व्यक्तीत्व आहे. तेथे द्वैत नाही, जेव्हा द्वैत असतं तेव्हा तुम्ही 'माझी बायको' असं म्हणणार, माझं नाक, माझा कान, माझं माझं याचा अर्थ काय ? जोपर्यन्त माझं माझं कराल, द्वैत खोलवर जाईल. पण जेव्हां मी म्हणते की मीच नाक आहे तेव्हां द्वैत नाही. शिव हीच शक्ती आहे आणि शक्ती म्हणजेच शिव. तिथे द्वैत नाही. परंतु आपण नेहमीच द्वैतात राहिल्यामुळे सतत आसक्ती येते. जर द्वैत नसले तर आसक्ती कुठं आहे ? जर तुम्हीच उजेड व तुम्हीच दिवा असाल तर, द्वित्व कुठे आहे ? जर तुम्हीच चंद्र व तुम्हीच प्रकाश असाल तर द्वित्व कुठे आहे ? तुम्हीच सूर्य व तुम्हीच प्रकाश, तुम्हीच शब्द आणि तुम्हीच अर्थ, तर द्वित्व कुठे आहे ? पण जेव्हा या दोन्ही गोष्टी निराळ्या होतात तेव्हां तिथं द्वित्व आलं. आणि निराळेपणाने आसक्ति येते, पण तुम्हीच ते झालात तर तुम्ही त्याला बांधील कसं असणार ? तेव्हा तुम्हाला हे कळतं का ? तुम्ही व तुमचे यांत वेगळेपण व अंतर असल्यामुळे तुम्ही त्याच्या बंधनात अडकता. तो मीच आहे, मग दुसरा कोण ? सर्व विश्व मीच आहे, तर मग वेगळे कोण ? परंतु ही नुसती बुध्दीची फेक नाही किंवा अहंकारातून निघालेली बुध्दीची झेप नाही. तेव्हां दुसरा कोणीच नाही. जेव्हा तुमचा आत्मा तुमच्या मेंदूत येईल तेव्हाच हे शक्य आहे. मग तुम्ही त्या विराटाचेच एक अंग बनता. मी जसं सांगितलं कि विराट म्हणजेच मेंदू. तेव्हा तुम्ही जे कराल, तुम्ही राग दाखवा, करुणा दाखवा, काहीही दाखवा तो आत्माच सर्व काही व्यक्त करीत असतो. कारण मेंदूचे वेगळे अस्तित्व राहात नाही. मर्यादित असलेली बुध्दी आता अमर्याद आत्मा झालेली आहे. त्या गोष्टीला उदाहरण कसे द्यावयाचे हे मला समजत नाही. परंतु ह्याला समजून घेण्याचा प्रयत्न करा. जर समुद्रात रंग टाकला तर समुद्र काही रंगीत होत नाही, नीट समजण्याचा प्रयत्न करा. परंतु अत्यंत थोडा रंग समुद्रात टाकला तर रंगाचे अस्तित्व पूर्णपणे नाहीसे होते. आता दुसऱ्या बाजूनी विचार करा. पण जर समुद्रच रंगीत असला तर तो वातावरणात फेकला काय किंवा कुठल्याहि लहान भागावर किंवा अणूरेणूत टाकला काय, तरु ते सर्व काही रंगीत होऊन जाईल. तेव्हा आत्मा हा प्रकाश असलेल्या समुद्रासारखा आहे. जेव्हा हा समुद्र तुमच्या मेंदूच्या लहानशा कपात ओतला जातो तेव्हा त्या कपाचे अस्तित्व रहात नाही आणि सर्व काही आत्माच बनते. तुम्ही अगदी प्रत्येक गोष्ट आत्मामय बनवू शकता. ज्याला तुम्ही स्पर्श कराल ते होईल. वाळू आत्मामय होईल. ग्रह तारे प्रत्येक गोष्ट आत्मामय होईल. तेव्हा आत्मा हा सागर आहे आणि तुमचा मेंदु हा मर्यादित आहे. तेव्हां तुमच्या या मर्यादित मेंदूतील आसक्ती नष्ट केली पाहिजे. तेव्हा तुमच्या मेंदूच्या मर्यादा तोडल्या पाहिजेत. म्हणजे जेव्हा हा सागर तुमच्या मेंदूत भरतो, तेव्हा तो लहानसा कप फुटेल आणि त्याचा प्रत्येक कण नी कण रंगीत होऊन जाईल. मग सर्व वातावरण काय तुम्ही बघाल ते सर्व काही, सर्व वातावरण रंगीबेरंगी बनेल. आत्म्याचा प्रकाशच आत्म्याचा रंग आहे. आणि आत्म्याचा प्रकाशच काम करतो, घडवितो, विचार करतो, सर्व काही करतो. मी आज शिवतत्व तुमच्या मेंदूत आणण्याचं ठरविलं. सर्वात प्रथम म्हणजे तुमच्या मेंदू शिवतत्वाकडे घेऊन जाण्यासाठी तुमच्या मेंदूलाच विचारा की, तू कुठे जात आहेस ? चित्त ह्यात घ्याल, त्यात घ्याल आणि निष्कारण त्यात गुंतून रहातोस, तेव्हा सर्वांतून मुक्त व्हा. ह्या उपाधी सोडा. आपलं चित्त सर्वांतून काढा आणि फक्त मेंदू

बना. पूर्णपणे निरासक्त बना. हा मुक्त झालेला मेंदू आत्म्याच्या रंगांनी पूर्णपणे भरुन टाका. ते आपोआप घडेल. जोपर्यन्त तुमच्या चित्तावर मर्यादा आहेत तोपर्यन्त ते घडणार नाही. तेव्हा प्रत्येकाने स्वतंत्रपणे अगदी निष्ठेनी ही तपस्या करावयास पाहिजे. अगदी प्रत्येकानी. मी तुमच्याबरोबर आहेच. तेव्हा असे पाहाता पूजेचीही आवश्यकता नाही. परंतु ती स्थिती मिळवायला पाहिजे आणि म्हणुन ती स्थिती येण्यासाठी पूजेची आवश्यकता आहे. मला आशा आहे कि, तुमच्यातील बरेचजण ह्यातील शिवतत्व व्हाल. परंतु मी तुम्हाला हालअपेष्टात रहावयास सांगत नाही. अशा तऱ्हेच्या प्रगतिमध्ये कष्ट नाहीत. जेव्हा तुम्ही समजाल की ही संपूर्ण आनंदाची स्थिती आहे. तेव्हाच तुम्ही "निरानंद" व्हाल त्या आनंदाला सहस्त्रारात हे नांव आहे. आणि तुम्हाला माहित आहे की, तुमच्या आईचं नांव "निरा" आहे. तुम्ही निरानंद होता.

आजच्या या शिवपूजेला वेगळाच अर्थ आहे. मला वाटतं कि, जे आपण बाह्यातून करतो, वरच्या थरांतुन करतो ते सूक्ष्मातही घडेल. मी तुमचा आत्मा तुमच्या मेंदूत सारण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु तुमचं चित्तच अजून गुंतलेले असल्यामुळे मला ते थोडं थोडं कठीण दिसते. तुमचा राग, लोभ, वासना, हावरेपणा साऱ्यापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करा. सर्व काही कमी करा. आज मी वॉरेन यांना सांगीतले की, त्या लोकांना कमी खाण्यास सांगा. आधाशासारखं खावू नका. एखादे वेळी मेजवानीत तुम्ही जास्त खाल. परंतु, प्रत्येकवेळी काही तुम्ही तसं खावू नका. हे सहजयोग्याचं लक्षण नाही. स्वतःवर ताबा ठेवा. मला माहित आहे, तुमच्यापैकी काही लोक विशेष करु शकणार नाहीत ते ठीक आहे. मी तुम्हाला बऱ्याच वेळा सांगेन आणि मदतही करीन. परंतु तुमच्यातील बरेचजण करु शकतील आणि तुम्ही प्रयत्न केले पाहिजेत.

तेव्हा आजपासून हा सहजयोग खोलात सूक्ष्मात आपण सुरु करु. तुमच्यातील काही तितके खोल काही जाणार नाहीत, परंतु पुष्कळांनी जास्त खोलात जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जवळजवळ प्रत्येकानेच. तुम्ही त्याकरितां जास्त शिक्षित किंवा अत्यंत सुखवस्तू असावयास पाहिजे असं अजिबात नाही. परंतु जे लोक समर्पित होऊन श्रध्देने ध्यान धारण करतात ते सूक्ष्मात जातात. कारण ते इतर सहजयोगाकरतां जणू काही अत्यंत खोलवर जाणारी पहिली मुळेच आहेत कि जेणेकरून इतर सहजयोगी त्यांचे पाठोपाठ जावू शकतील.

आजच्या पूजेकरता गणेश अथर्वशीर्ष म्हणूया. यावेळी पाय वगैरे धुण्याची आवश्यकता नाही. फक्त गणेश अथर्वशीर्ष म्हणा. शिव कायमच स्वच्छ, शुध्द व निर्मळ आहेत, जे निर्मळ आहे त्याला काय स्वच्छ करणार ? कोणी म्हणेल की, माताजी आम्ही जेव्हा आपले चरण धुतो तेव्हा आम्हाला पाण्यात आपल्या चैतन्य लहरी मिळतात. परंतु यावेळी सर्वकाही इतके निरासक्त आहे की, या अवस्थेत हे सर्व धुवून टाकलेले आहे, स्वच्छ केलेले आहे की तेव्हा धुण्याची आवश्यकता नाही. नंतर आपण देवी पूजन करु. कारण गौरी जी कुमारिका आहे तिची पूजा करु. आपण तिची १०१ नावे म्हणू आणि नंतर शिवाची पूजा करु. मी एका भाषणात यावद्दल सर्वकाही सांगू शकत नाही. परंतु निरासक्ती ही तुमच्या जागृतीमध्येच तुमच्यात यावयास हवी. शरणागति म्हणजे काय ? काहीच नाही. कारण जेव्हा तुम्ही तुमच्या आसक्तीतून मुक्त होता तेव्हा आपोआपच तुम्ही शरण जाता. जेव्हा तुम्ही कशाला चिकटून बसता तेव्हा तुम्ही शरण आलेले नसता. मला शरण जावून तुम्ही काय देणार ? मी अगदी निरिच्छ आहे. मला हे काहीही समजत नाही. मला तुमच्यापासून काय मिळवायचं आहे ? काहीही नाही. मी अतिशय निरिच्छ आहे.

तेव्हां आज आपण अशी प्रार्थना करु की, "हे परमेश्वरा, आम्हाला शक्ति दे आणि जे सर्वांत जास्त आकर्षक आहे, किंवा सर्व आकर्षणाचा उगम आहे ते दे कि ज्याच्यामुळे इतर सर्व सुखे ऐषाराम वाढविणारा आनंद, वगैरेची आकर्षणे सोडून देऊन आम्ही पूर्णपणे शुध्द आनंद हेच ज्याचे रूप आहे अशा शिवतत्वात जाऊ". मला वाटतं की, मी इथे का आले आहे व आजचा दिवस का मोठा आहे हे स्पष्ट केलं पाहिजे. आज जे तुम्ही इथे आहात ते विशेष करून नशीबवान लोक आहात की आजच हे भाषण ऐकण्यासाठी व इथे उपस्थित रहाण्यासाठी परमेश्वराने दयाळू होऊन तुमची निवड मुद्दाम केली आहे आणि एकदा का तुम्ही निरासक्त व बिनरोगी झालात की तुम्हांस एक जबाबदार व अभियुक्त झाल्याचं जाणवावयास लागेल. जबाबदारी ही अहंकार निर्माण करणारी नाही तर ती स्वतःच सिध्द होणारी व्यक्त होणारी प्रगट होणारी अशी असेल.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# तत्व की बात - ३

***गांधी भवन, दिल्ली विश्वविद्यालय***

***१६ फरवरी १९८९***

सहजयोग की तारीफ तो मैंने बहुत खोलकर कर दी । लेकिन असलियत यह है कि ; नहीं - यह तो जानने की बात है । हमारे यहाँ भी अहंकार कुछ कम नहीं है विश्वमें । लेकिन बेकार की चीज का हमें अहंकार हो जाता है और यह इस तरह कुछ बेकार की चीजें है कि उसके बारे में हम लोग जानते हुए भी महा बेवकूफी है, हम उसे करते रहते हैं । सहजयोग जो है आपको सत्य के दर्शन कराता है । सत्य जो है, था और रहेगा । उसके मामले में आप कोई (compromise) समझौता नहीं कर सकते कि आप कहें कि " चलिये , माँ ऐसा ही क्यों नहीं कह देते आप , जो काम बन जाए । इस तरह से बोल दीजिये तो अच्छा रहेगा । इस तरह से कह दीजिये तो अच्छा रहेगा । " ऐसी कोई बात सत्य नहीं है । जो है, सो है, वो उसी तरह से रहना है ।

और अगर आप सत्य को नहीं मानना चाहोगे तो उसका आपको भोग उठाना पडेगा । माने ये नहीं कि सत्य आपको हानि देता है लेकिन सत्य को अगर आप छोड दें तो आप असत्य पर उतर आये । और जब असत्य पर उतर आये तो असत्य तो हानिकारक है ही, वो आपको तकलीफ देगा । ऐसा भी हुआ है कि बहुत से लोग सहजयोग में आये , बहुत कुछ ऊँचे उठ गये ; बडा उन्हें लाभ हुआ ; बहुत कुछ पा लिया ; बहुतों को पार किया ; उसके बाद उन्होंने सहजयोग छोड दिया । उसके बाद आप एक साल बाद आये, " कि माँ मुझे तो बीमारी होगई अब मैं क्या करूं ?" ऐसे भी बहुत से लोग होते हैं । तो कहने लगे कि "देखो , सहजयोग ने हमको सजा दे दी । " ऐसे भी बहुत लोग होते हैं । सहजयोग ने आपको सजा नहीं दी लेकिन अगर आप किसी की छत्र-छाया में बैठे हैं और उसे छोडकर आप बाहर जायें और आप पर अगर बरसात आ जाए तो क्या आप कहिएगा कि इस छत्र-छाया ने ही आपको तकलीफ दे दी ? आपने ही अपनी छत्र-छाया मिटा दी और आप बाहर चले गये । पर सहजयोग में रहने से ये छत्र-छाया का आपके ऊपर उपकार है या आपका उस छत्र-छाया पर उपकार है ? यह तो छत्र-छाया का उपकार है, परम उपकार है । उसने आपको अपनाया और अपने अन्तरगत रक्खा और आपकी छोटी-छोटी बातोंका भी ख्याल रक्खा ।

सहजयोग में जो बहुत सी बातें होती है , उनमें से जैसे कि मैंने आपसे बताया था कि लक्ष्मी जी का भी प्रसाद आपको मिलता है । और लक्ष्मी जी का प्रसाद क्या होता है , यह भी मैंने आपको बताया कि नाभि चक्र में श्री लक्ष्मीजी विराजती है , उनके शक्ति विराजती है । और लक्ष्मीजी कैसी हैं ? इसका भी वर्णन मैंने आपको बताया था कि श्री लक्ष्मीजी जो हैं उनमें और पैसे वाले में महान अन्तर होता है । लक्ष्मीजी कमल पर खडी हैं उनके हाथ में कमल है और एक हाथ देने वाला और एक हाथ आश्रय में । कमल पर ये खडी हैं सो लक्ष्मीजी देखने में तो काफी भारी-भरकम दिखाई देती हैं । कभी आपने लक्ष्मीजी को एकदम ऐसा न देखा होगा जैसे कि आजकल की beauty queens होती हैं । लेकिन उनकी तन्दुरुस्ती काफी अच्छी हैं क्योंकि उनके अन्दर बहुत कुछ ज्यादा पानी का समावेश है । उनका जन्म ही पानी से हुआ है न । जिसका जन्म पानी से हो , उसके अन्दर तो पानी बहुत होना पडता है । उसकी भी वजह होती है । उसके अन्दर पानी न हो तो उनके अन्दर जो इतने चक्र चलाने पडते हैं उसके लिये buffer (बफर), उसके लिये रुकावट , उसके लिये एक बीच में बचाव और कुछ नहीं रह जाता इसलिये पानी शरीर (body) में होना बहुत जरुरी होता है और इस वजह से भारी-

भरकम होती हैं । तो भी वो कमल के ऊपर खडी हैं, माने उनकी तबियत से इस कदर, शब्द नहीं हैं हन्दी में - पर जिसे कहना चाहिए कि इस कदर वो सधी हुई हैं कि तबियत से वो इस कदर सधी हुई हैं कि पूरा बैलेन्स (balance) करके और उनका कोई वजन ही नहीं डालती, वो कमल पर कोई उनका वजन नहीं डलता, कि आपना बोझा वो किसी पर नहीं डालतीं । आप देख लीजिये लोग कितना बोझा दूसरों पर डालते हैं । अब जैसे कोई मेहमान आ गये । आते ही साहब, हमारे खासकर सहजयोगी लोग भी कभी कभी ऐसा काम करते हैं, यह खासियत हिन्दुस्तानी सहजयोगियों की भी होती हैं ।

जैसे कि आप कहीं से आये, अब देहली में आ गये कोई सहजयोगी । तो वो पहले कहेंगे कि साहब यहाँ कुछ आराम हमें नहीं मिल रहा और यहाँ पर हमें खाने को ठीक नहीं मिल रहा है । यहाँ यह इन्तजाम ठीक नहीं है, यहाँ कोई इन्तजाम ठीक नहीं है जैसे अपने घर में तो ये लोग बिल्कुल आलीशान बगीचों में ही रहते हैं । यहाँ आते ही अब सब उनको सब पता हो जाता है कि साहब यहाँ की यह चीज ठीक नहीं है, यहाँ फलानी चीज अच्छी नहीं है । कोई अगर बम्बई आये तो उनका भी सही हाल है । मतलब आप एक काँटा बनकर रहते हैं, हर जगह की तरह आप फूल जैसे नहीं रहते, आप काँटे की तरह हैं । हर आदमी को आप चुभते रहते हैं । हर आदमी को महसूस होना चाहिये कि आप आये हुए हैं, आप एक विशेष चीज हैं । आप कोई न कोई विशेष चीज हैं । इस तरह से हम लोग अपना जीवन जो हे वो सोचते हैं कि हमने बहुत महत्व पूर्ण कर लिया और जिस आदमी पर जितना ही ज्यादा रुपया होगा वो उतना ही ज्यादा नखरे कर रहा है । जितना आदमी गरीब होगा, अपने देश में, उतने ही उसके कम नखरे होंगे । लेकिन जितना आदमी रईस हो जायेगा उतने ही उसके नखरे ज्यादा हो गये और लक्ष्मीजी के कोई नखरे नहीं बेचारी के । वो तो कमल पर अब भी खडी ही रहती हैं कभी यह भी नहीं कहाँ कि मैं थक गई हूँ, मैं थोडी देर को लेट ही जाऊँ । कोई भी समय वो इस कमल पर अपने शरीर को सम्भाले हुए, इतने बडे शरीर को सम्भाले हुण खडी रहती हैं, बिल्कुल हल्की सी । किसी को महसूस ही नहीं होता है । यह असली लक्ष्मी तत्व की निशानी है । जिस आदमी में वास्तविक लक्ष्मीजी है, उसका कहीं भी बोझा नहीं लगता । ऐसा आदमी जहाँ भी रहता है उसकी सुगन्ध, उसका सौरभ सब तरफ फैलता है लेकिन उसकी कोई भी चीज महसूस नहीं होती । कहीं भी वो आपको नहीं जताता है कि आप पैसे वाले हैं या आप पैसे वाले नहीं है, या उसके पास ज्यादा पैसा हैं या आपके पास इस चीज की कमी है । वे तो इस तरह से रहता है कि किसी को पता ही नहीं चलता कि कैसे आये और कैसे गये। वो इस तरह से जीवन बिताता है कि जैसे किसी का पता ही नहीं चलता लेकिन अधिकतर पैसे वाले तो पहले बीन बजा कर घुमेंगे कि साहब मैं बडा पैसे वाला हूँ । कुछ नहीं तो अजीब तरह का इुतझुन लेकर रास्ते में बजाते चलेंगे जिससे कि लोग मुड २ कर देखें कि कौन गधा चला जा रहा है । हर चीज का दिखावा (show) होना चाहिये । हर चीज की artificiality होनी चाहिये । एक एक तमाशा आदमी खडा कर देता है अपने नाम से क्योंकि वो पैसे वाला है । यह लक्ष्मीजी की बात नहीं, लक्ष्मी बहुत ज्यादा एकदम ऐसे तरीके से रहती हैं, सम्भली हुई, सधी हुई कि किसी को पता ही न चले । एक हाथ से उनके दान होना चाहिये, वह दान भी किसी को पता नहीं होना चाहिये कि दान हो रहा है । जैसे बह रहा है, जा रहा है, दे रहा है; लेने का सवाल नहीं और दूसरे हाथ से आश्रय होना चाहिये जो उनके आश्रित हैं वो सब आशीर्वादित होन चाहियें, बजाय इसके कि बहुत से मालिक अपने नौकरों को मारते हैं, पीटते हैं, यह करते हैं – नहीं, आश्रित माने उनको पूरी तरह से जो लक्ष्मीजी के आश्रित होते हैं उनको पूरी तरह से वरद हस्त होता है, पूरा वरदान होता हैं ।

और उनके दोनों हाथ में कमल होते हैं । कमल गुलाबी रंग के होते हैं और गुलाबी रंग के कमल इस बात के द्योतक हैं कि वो प्रेम की निशानी हैं । गुलाबी रंग जो है वो उनके प्यार की निशानी, प्रेम की निशानी; वो बिल्कुल ही नाजुकतम पुखडियों में भंवरे जैसा काँटेवाला प्राणी होता हैं उसे भी स्थान देती हैं; कहीं से भी चला आये उसे रहने का इन्तजाम है । हर समय उसके लिये इन्तजाम रहता है । ऐसा आज तक मैंने तो कोई पैसे वाला नहीं देखा कि उसके दरवाजे कोई चला आये और अच्छा भाई तुम्हें कोई जगह नहीं, आओ मेरे घर सो जाओ । वो तो चार चार दरवान लगा कर रखेगा कि कोई अच्छा भी भला आदमी हो तो उसको पीट के, मार के भगा दें ।

इस प्रकार हमारे अन्दर जो लक्ष्मीजी का तत्व है वो हमारे नाभि चक्र में है । इसके बारे में मैंने आपसे बता दिया । जैसा वो है वैसा ही है । उस तत्व को हम बदल नहीं सकते । बाहर

का आप सब कुछ बदल दिजीये लेकिन उसका तत्व जो है वही बना रहेगा । तत्व न बदल सकता है, न ही उसको आप बदल सकते हैं ।

सुषुम्ना पथ पर अगर आप रहें तो आपको कोई बिमारी नहीं हो सकती – विशेषकर कैंसर नहीं हो सकता । अगर आप left को या right को किसी भी अतिशयता पर चलें जायें तो आपको कैंसर (cancer) हो सकता है । इसलिये आपको बीचों बीच रहना है ।

सहजयोग में आने के बाद हजारों लोगों ने, सिगरेट पीना एकदम छोड दिया । इसी तरह से जिनका गुरुतत्व ठीक हो गया उन्होंने शराब वगैराह एकदम छोड दिया ।

अब जो विशुध्दि चक्र है उसकी विशेषता यह है कि विशुध्दि चक्र, जब हमने गर्दन उठाई और जब हम मनुष्य बन गये तभी विशुध्दि चक्र पूरी तरह से प्रादुर्भावित हुआ । इससे पहले इसका जो काम था वो पुरा नहीं हुआ था और अब जो है १६ इसकी कलाएं हैं । श्रीकृष्ण को १९ कला कहते हैं । और उसी तरह से १६ उसके subplexus हैं । जिसका विशुध्दि चक्र ठीक होगा उसका मुखडा सुन्दर होगा, तेजस्वी होगा । उसकी आँखे तेजस्वी होंगी, उसके नाक नक्श तेजस्वी होंगे और उसके अन्दर एक तरह का बहुत ही ज्यादा detached सा भाव होगा जैसे कि ड्रामा जैसा । उस आदमी के मुख पर ऐसा लगेगा जैसे कि ड्रामा चल रहा है । एक पल में वो नाराज होगा और दूसरे ही पल में वो हंसता रहेगा । बस उसकी अठखेलियाँ चलती रहेंगी ।

जिसका विशुध्दि चक्र खराब हो जाता है उसकी शक्ल खराब हो जाती है, पहली बात । अजीब सी विकृत सी शक्ल हो जाती है, अजीब सी भयानक सी उनकी शक्ल दिखाई देने लगती है, कभी डरावना सा, कभी डरा हुआ सा । अब हम लोग इतने ड्रामें beauty - क्या क्या करते हैं न हम लोग, उसके लिये धन्धे कोई करने की जरुरत नहीं । आप अपना विशुध्दि चक्र ठीक कर लीजिये आपकी शक्ल दुरुस्त हो जायेगी - बहुत शक्ल दुरुस्त हो जायेगी और इसके अलावा, जिसकी विशुध्दि चक्र की पकड हो जाती है उस आदमी की आवाज बहुत कर्कश या बिल्कुल धीमी या वो मधुरता को खो बैठता है । और दूसरी चीज यह है कि हमारे अन्दर विशुध्दि-चक्र की जो left-side है, जिसे कि हम कह सकते हैं कि हमारे चक्र के left-side में बिराजती है वो विष्णु - माया है, माने श्रीकृष्ण की बहन जो विष्णु - माया थी । अब जब हमारे भाई - बहन के रिश्ते खराब हो जाते है किसी भी माने में, तो यह चक्र खराब हो जाते हैं । जब भाई बहनों की कद्र नहीं करता, अपनी बहनों को सताता है, तो भी चक्र खराब हो जाता है । लेकिन जब संसार में हम हर औरत की ओर गंदी नजर से देखते है और हमारे अन्दर यह विचार नहीं रह जाता है कि यह हमारी बहन है तब यह चक्र बहुत ही बुरी तरह से खराब हो जाता है । और जब left विशुध्दि खराब हो जाती है तब आदमी को यह लगता है कि मैंने बडी गलती करी, अन्दर से उसे लगता रहता है और वो एक तरह से guilty आदमी हो जाता है । कभी - कभी यह guilt इतना बढ जाता है कि उसमें से अनेक पाप होने लग जाते हैं । guilt-complex उसके अन्दर आ जाता है । इसलिये सहजयोग में इसका मन्त्र है, अंग्रेजी में तो कहते "I am not guilty" और हिन्दी में कहते हैं "कि माँ हमने कोई गलती नही करी जो तुम माफ नहीं करो ।" right-side की जो विशुध्दि है ये विट्ठल-रुकमणी वाले कृष्ण, जब कि कृष्ण राज्य कर रहे थे तब । जब हम अपने राज्य में विराजते हैं, माने हमारा राज्य परमात्मा का राज्य हुआ, और जब परमात्मा के राज्य में हम विराजे हुए हैं और तब भी हम भिखारी जैसे बक बक करते हैं, और लोगों से रुपया मांगते हैं, पैसे मांगते हैं और उनकी चापलूसी करते हैं और उनके सामने अपनी पेशानी झुकाते हैं तब right विशुध्दि पकड जाती है । जो आदमी अपनी पेशानी अपनी किसी गरज के लिये दूसरों के सामने झुकाता है कि उसे वो गुरु या और कुछ उसे मानता है तो उसकी right विशुध्दि पकड जाती है और right विशुध्दि पकडने के नाते बहुत तरह के complications होते हैं विशेषकर कि cancer की बीमारी इसमें हो सकती है । क्योंकि जो लोग चापलूसी में जाकर इसके पैर छू रहे हैं, उसके ये कर रहे हैं, करते हैं, जान ले कि आखिर आपको परमात्मा के सिवाय और किसी के सामने अपना सिर नहीं झुकाना है । और किसी के सामने सर झुकाने की जरूरत भी क्या है, वह दे भी क्या सकता है ? बहुत से लोग हमें कहते हैं कि वो सन्त - साधु थे हमने माथा उनके सामने झुकाया । अधिकतर तो ढोंगी और भोंदु लोग हैं, नहीं तो ४२०, या दानव और राक्षस ही है। अच्छा अगर यह नहीं हुए तो समझ लीजिये एक साधु - सन्त है, वो पार भी है, समझ लीजिये, तो भी इन्सान है, भगवान तो

नहीं है । अवतार तो नहीं है । जब तक कोई अवतार नहीं हो तो अपना सर झुकाने की क्या जरुरत है ? तुम भी कल हो सकते हो पार, और तुम भी कल सन्त हो सकते हो । लेकिन जो अवतार है उसके सामने सर झुकाना दूसरी बात है क्योंकि उसके सामने सारे चक्र खुलते हैं । सिर्फ अवतार के सामने ही सर झुकाना चाहिये । यह दूसरी बात है कि अपने माँ बाप हैं उनके सामने सर झुकाओ, वो तो एक रोजमर्रा का एक व्यवहार है उसकी बात दूसरी है । शादी में गये, मां बाप के पैर छू लिये, बड़ों के पैर छू लिये ये बात दूसरी है । एक बार वो कर लिया वो तो सम्मत है ।

लेकिन हर बार जिसको देखिये कि वो चले आ रहे हैं महाशयजी उधर से, और कहा साहब यह तो minister साहब के यहां बिल्कुल उनके चमचे हैं चले चार और चमचे उनके पीछे उनके पैर छूने के लिये । इस तरह की जिन लोगों की दशा होती है वो इस कदर दुख में पड जाते हैं और इतनी तकलीफें उठाते हैं कि मैं उन लोगों को ठीक करते करते तंग आ गई । क्योंकि मनुष्य को अपनी इज्ज़त और अपनी शान का पता नहीं । ये चक्र जो है इसने आपको शान दी । जिसने आपके सर को ऊपर उठाया । यों नहीं दी कि इसको आप हर जगह झुकाते फिरें और अपने को नीचे गिराते फिरें । आप बहुत बडी चीज हैं । भगवान ने आपको एक अमीबा से इन्सान बनाया और जब आप इस हालत में आ गये तो आपको जरूरी है कि आप इसकी इज्ज़त करें अपनी इज्ज़त करें और अपनी जो शान है उसको समझे । दूसरी बात यह है कि बहुत से लोगो का यह भी है कि दूसरों से डरते रहते हैं । यह भी चक्र है इससे left विशुध्दि पकड जाती है । जब आप किसी आदमी से डर जाए; बास्तव में आप बेकार ही में डर रहे हैं तब आपकी left विशुध्दि पकड सकती है ।

विशुध्दि चक्र बहुत महत्वपूर्ण है और विशुध्दि चक्र के पकडने से अनेक तरह की बिमारियां आती हैं । सबसे खराब बात यह है कि जब आप पार भी हो जाते हैं तो भी आपको vibrations नही आते । आपको महसूस नहीं हो पाता । आपकी जितनी nerves हैं हाथ की मर जाती है तो हाथ पर आपको महसूस नहीं होता । और लोग कहते हैं कि हमको अन्दर तो महसूस हो रहा है पर हाथ पर महसूस नहीं होता और इसलिये उनको परेशानी हो भी जाती है । सबसे बडी शराबी विशुध्दि की यह है । अगर आपने गलत मन्त्र कहे हैं, आपने किसी ऐसे आदमी से मन्त्र लिया हैं जो अनाधिकार है, जिसने आपको झूठे मन्त्र दिये है, इस सबसे आपकी left विशुध्दि पकडती है और इस left विशुध्दि का इलाज यही है कि उस मन्त्र को जो है जागरूक कराना । अगर कोई मन्त्र जागरूक नहीं है तो उसे रटना ही नहीं है । और मन्त्र जागरू तभी होता है जब कोई realised soul आपको मन्त्र बताये और वो भी निदान कर बताये कि आपको कहां तकलीफ है, कौन सी तकलीफ है, किस जगह कौन सा मन्त्र कहना है । अगर वो बराबर आपको यह बता सके तो आप उस मन्त्र को कहें तो आपको मन्त्र सिध्दि हो सकती है । सहयजोग में आज ऐसे हजारों लोग है जिन्होंने मन्त्र को सिध्द कर लिया है । इतने मन्त्र सिध्द है उनके कि वो अगर अपनी जगह में भी बैठकर मन्त्र कह दें तो उससे जो काम करना है करा सकते हैं । मतलब है बूरा काम तो सहजयोग में कोई कर ही नहीं सकता लेकिन अच्छे कर सकते है । ऐसे ऐसे लोग पहुँच गये हैं सहजयोग में, दिल्ली में नहीं हैं, इतने दिल्ली में कोई लोग बहुत पहुँचे हैं, लेकिन इतने ज्यादा लोग नहीं हैं । बाकी ऐसे बहुत से लोग जिन्होंने मन्त्रों को एकदम सिध्द कर लिया है और उस सिध्दता के लिये मन्त्र पर मेहनत करनी पडती है । बैठ कर मेहनत करनी पडती है, उस पर बोलना पडता है अपने चक्रों पर ध्यान करना पडता है और उसकी सिध्दता सफल हो जाती है। अगर किसी ने गणेश का मन्त्र सिध्द कर लिया है तो वो आदमी इतने कमाल कर सकता है कि कोई हद नहीं । लेकिन अभी तक सहजयोग में ऐसे बहुत थोडे लोग हैं कि जो इस ओर ध्यान देते हैं । और जिन्होंने भी ध्यान दिया, ऐसे मैंने बहुत से लोग देखे हैं जिन्होंने मन्त्र को इतनी जल्दी सिध्द कर लिया है कि मुझे आश्चर्य होता है । उनके एक ही मन्त्र से कितना बडा कार्य हो जाता है । इसलिये मैं आपसे कहती हूँ कि अपने विशुध्दि चक्र को आप स्वच्छ रखें । विशुध्दि चक्र जो है यह बिराट है । कृष्ण विराट - स्वरुप हैं । अन्त में कृष्ण विराट हो जाते हैं । सारा जो evolution (उत्क्रान्ति) है ये सिर्फ विष्णु शक्ति से होता हैं तो विष्णु बनते बनते आखिर विराट हो जाते हैं । विराट का स्थान ये हैं, ये विराट का स्थान है । इसी से विशुध्दि सक्र को ठी करने के लिये ये पेशानी आप किसी के सामने मत झुकाइये । ये विराट के सामने ही झुकनी चाहिये क्योंकि आप विराट के अंग प्रत्यंग हो गये हैं । अब आप पार हो गये । अब खबरदार, अगर जो आपने अपनी पेशानी किसी

के सामने झुकाई । अगर आपने किसी के सामने झुकाई तो आप विराट को भूल गये । मोहम्मद साहब ने बहुत बडा मन्त्र विराट का कहा है "अल्लाह हो अकबर" और ये मन्त्र जो मोहम्मद साहब ने (वो साक्षात् दत्तात्रेय थे) और उन्होंने ये मन्त्र कहा है कि आप "अल्लाह हो अकबर" कहो । अकबर माने इज्ज़तदार, माने विराट । ये जो उंगली विशुध्दि की है, दोनों उंगली कान में डालकर ऊपर पीछे की तरफ गरदन कर के "अल्लाह हो अकबर" कहें तो आपका विशुध्दि चक्र खुल जाता है । इसके अलावा और बहुत से आसन आदि है । इसके मामले में मैं आपको बता नहीं सकती आज, लेकिन अनेक तरीके से यह ठीक हो सकता है और उसको ठीक रखना चाहिये । सबसे बडी बात है कि आपकी जबान से कोई भी कडवी बात किसी से कहनी नहीं चाहिये और किसी की भी चापलूसी करने की जरूरत नहीं है । और अगर कोई सहजयोग को नहीं मानता तो साफ कह देना चाहिये कि रहने दीजिये "यह आपके बस का नहीं, छोडिये । " न ही किसी के सामने चापलूसी करने की जरूरत है, न ही किसी के सामने घिघयाने की जरूरत है और न ही किसी से कठिन बात करने की जरूरत है । मानते हैं तो ठीक है वरना छोड दीजिये बस काम खत्म । बीचो-बीच में रहना चाहिये ।

विशुध्दि चक्र के अनेक दोष हैं । उसके अनेक तरीके हैं क्योंकि सोलह उसकी कुल कलाएं हैं और सोलह हजार इसकी शक्तियां है जो कृष्ण के साथ उनकी पत्नियाँ बनकर उनके समय में रही थी । यदि कोई कृष्ण के ऊपर कहे, वो इस तरह के आदमी होतो बडा आश्चर्य होता है क्योंकि वो योगेश्वरों के योगेश्वर थे । उनको समझने के लिये आपको बहुत कुछ अधिक सीखना पडेगा । वो स्वयं साक्षात् योगेश्वर थे । ये उनकी १६००० शक्तियाँ थी जिनको उन्होंने जन्म दिया था इस संसार में और फिर उनको ही उन्होंने कैद करवाया और फिर उनसे विवाह किया क्योंकि उनके पास सहजयोगी तो थे नहीं तो उन्होंने सोचा कि ठीक है मैं अपनी शक्तियों को ही साकार स्वरूप में संसार में भेजता हूँ और उन्होंने सहजयोग की कृषि करी । उन्होंने इस पूरी तरह से बीज को फैलाया और ईसा मसीह ने बाद में आज्ञा चक्र में आकर कहा कि कुछ बीज इधर पड गये, कुछ बीज उधर पड गये, कोई बीज उधर बीज पड गये, कोई बीज इधर पड गया । जब ईसा मसीह अपने बाप की बात करते हैं तो वो दुसरा तीसरा कोई नहीं है, वो कृष्ण ही हैं । कृष्ण ही उनके पिता हैं । जब भी ईसा मसीह की उंगलिया देखिये तो ये दो उंगलियां हैं । यह उंगली विष्णु की है, यह उंगली कृष्ण की है । हमेशा उन्होंने अपने बाप की बात की इसके लिये आप अगर पढतें हो तो देवी-भागवत् पढें । इसमें महा विष्णु का वर्णन है जो राधाजी का पुत्र बनाया हुआ था और बिल्कुल वही चीज ईसा मसीह हैं । उनके दो हिस्से थे । एक हिस्सा श्री गणेश और एक ईसा-मसीह, आगे चलकर के एकादश-रुद्र में सही जो बडी भारी शक्ति है वो ॐ की शक्ति है इसीलिये वो मरें नहीं उनका resurrection (पुनरुत्थान) हो यह गया । साक्षात् प्रणव हैं जो कि संसार में आया और इह संसार से उठकर चल गया । यह साक्षात् गणेश था जो इस संसार में आया और इसीलिए उसको कोई चीज मार नहीं सकी । यह एक ही अवतार ऐसा परमात्मा ने भेजा था जो साक्षात् 'प्रणव' था । इनका क्रॉस पर चढाना, जो है वो इसलिये हुआ था कि आज्ञा चक्र को उनको खोलना था, आज्ञा चक्र को । जब मनुष्य ने अपनी बेवकूफी से उनको क्रॉस पर चढा दिया तब मानो जैसे कि उन्होंने सबके लिये अपने को उस आज्ञा-चक्र से निकाल दिया और उनका जो सन्देश है वो क्रॉस नहीं है । उनका सन्देश जो है पुनरोत्थान हैं । उन्होंने उसमें से पुनरुत्थान करके दिखाया । उन्होंने मर करके जी कर दिखाया । वही सहजयोग है कि जिसमें आपकी भी जो conception है वो immaculate है यानि आप भी माँ के हृदय गर्भ में आप आते हैं और वहां से मां आपको ब्रम्हरन्ध्र से पैदा करती है आप जो पहले है वो मर जाते हैं और एक नये हो जाते है । ईसा मसीह ने यह सबसे पहले, उन्होंने करके दिखाया था । वो सबसे बडा बेटा मां का था और वो आपका सबसे बडा भाई है जिसने यह सबसे पहले इतना बडा काम करके दिखाया । और आज उसी बूते पर आप लोग पार हो रहे हैं । जो भी incarnations (अवतार) आते हैं वो अगवाई करते हैं । एक step forward जो होता है, वो अगवाई करते हैं और उन्होंने यह बडा भारी महान कार्य किया था । और आज्ञा चक्र पर जो आदमी पार हो गया है वो जानता है कि हमारा मन्त्र उस पर सहजयोग में Lord's prayer है । Lord's prayer से आज्ञा चक्र एकदम छूट जाता है । जोकि उसमें कही है कि, "जैसे कि हम अपने अपराधों की क्षमा करते हैं, अपराध जिन्होंने हमारे खिलाफ किये है उनकी क्षमा करते हैं, उसी प्रकार हे प्रभू ! हमारे अपराधों को क्षमा करो । " यही मन्त्र आज्ञा चक्र का है, आपको आश्चर्य होगा । और बहुत बार मैं आपसे कहती हूँ कि "माफ कर दो, माफ कर दो" क्योंकि आपका आज्ञा चक्र

पकडा है । अहंकार और प्रति-अहंकार दोनों के बीच इनका स्थान है जहाँ पर पिट्टरी (pitutary) और पीनीयल बॉडी (pineal body) भी दोनों को सम्भालती है, इनके बीचों-बीच एक बहुत सूक्ष्म स्थान आज्ञा का है और यह दोनों इस पर काम करते हैं । शुरूआत तो दोनों की विशुध्दि चक्र से होती है पर इनका चलन-वलन और सम्भालना और (steering) स्टीयरिंग जो है वो आज्ञा चक्र से होता है पर जिस पर साक्षात् महागणेश और महाभैरव बैठे हुए हैं और जो सामने की तरफ यहाँ, ये जो आज्ञा चक्र के, ये जो है यहाँ पर ईसा-मसीह का स्थान है । ईसा-मसीह महाविष्णु हैं और उनके लिये कृष्ण ने कहा था कि मुझे जो-जो चीज संसार में अर्पण करेंगे उसमेंसे सोलहवां हिस्सा तुम्हारा रहेगा और तुम सारे संसार का आधार बन कर आओगे और मेरे से भी ऊपर तुम्हारा स्थान रहेगा । हालांकि श्री कृष्ण का स्थान यह है विराट का, लेकिन यहाँ पर बीच में आज्ञा चक्र में दोनों जगह विशुध्दि और विराट के बीचों-बीच में उन्होंने अपने बेटे को बैठाया है और राधाजी उनकी माँ थी, वही मेरी थी । राधाजी जो थी वो ही संसार में मेरी (Mary) के रूप में आई थी और वो ही इस बेटे को लाई । यह सारा खेल और नाटक इसलिये किया गया कि मनुष्य अपनी मूर्खता को समझ ले कि अहंकार में अपने ego में उन्होंने ईसा-मसीह जैसे आदमी को, जोकि साक्षात् ब्रम्हस्वरुप थे, उनको तक पहचाना नहीं । लेकिन अब ऐसा नहीं हो सकता ।

ईसा-मसीह ने कहा है "कि मेरे खिलाफ चाहे आपने कुछ भी कहा हो उसकी मैं माफी करता हूँ और मेरे साथ आपने कोई भी ज्यादती की है उसके लिये मैं माफी देता हूँ लेकिन अगर Holy Ghost माने आदिशक्ति के खिलाफ अगर किसी ने जरा सा भी कदम उठाया तो उसको मैं देख लूंगा ।" साफ-साफ शब्दों में कहा है । उसका punishment जो है वो बहुत गहरा होगा । साफ-साफ उन्होंने इन शब्दों में कह दिया है कि अगर आप बाइबिल (Bible) पढें तो आप देख लें । इसका मतलब उन्होंने कह दिया कि Holy Ghost (आदिशक्ति) संसार में आने वाले हैं और Holy Ghost से ठण्डी आयेगी, Cool breeze आयेगी; यह भी बाइबिल में लिखा है । इसलिये ईसाई लोग मुझे जरा (मतलब हिन्दुस्तान के नहीं लेकिन बाहर के) मुझे बहुत जल्दी मान जाते हैं क्योंकि यह पहचान है Holy Ghost की । यह आदि-शक्ति की पहचान है । और किसी से भी ऐसी ठंडी हवा नहीं आती है जैसी Holy Ghost से आती है, जैसे कि लिखा हुआ है ।

पर सबसे तो आश्चर्य है वहाँ एक विलियम ब्लेक (William Blake) नाम का आदमी जोकि बहुत बडा कवि सौ, साल पहले हो चुका है, उसने यहाँ तक लिख दिया है कि हमारा आश्रम कहाँ रहेगा । Lambethvale (लेम्बैथवेल) मे आश्रम रहेगा जहाँ ruins (खंडहरों) में foundations (नींव) पडेंगे, जो सही बात है । और जब पहले पहल जब मैं London गई थी, तो जब जहाँ Surrey hills (सरे-हिल) में मैं रहती थी, वह भी लिखा है कि first resience in the little surrey hills, और यहाँ तक लिखा है कि उनके जो प्यार के Vibrations (वाईब्रेशन्स) हैं जो स्नायु हैं वो ईश्वर की तरह हर जगह हर एक समय विद्यमान हैं । और इतनी बारीक चीज सहजयोग की लिखी है और सबसे बडी बात तो उन्होंने लिखी है वो यह कि सहजयोग में लोग prophets होएंगे यानि प्रेषित यानि पार हो जायेंगे । ये भगवान के लोग हैं (Men of God) जो पार हो जायेंगे और एक विशेष बात होगी कि ये लोग जो पार होंगे वो दूसरों को भी prophets बनाएंगे । इसका सारा वर्णन उन्होंने दे दिया है । इसी तरह से Bible में भी John के Revelations में सहजयोग के बारे में सब कुछ लिखा हुआ है। जो समझने वाले हैं वो उसे पार होने के बाद समझ सकते हैं । इसी तरह की भविष्यवाणियाँ हर एक जगह हुई हैं । जो समझदार लोग हैं वो सब कुछ समझते लेकिन जो समझदार नहीं हैं उनके लिये काला अक्षर भैंस के सामने क्या होता है वैसी ही बात है । इसी तरह की चीज है कि आदमी को समझाने के लिये ही पार कराना पडता है ।

जब तक आपके अन्दर प्रकाश नहीं आयेगा, आप भी इस बात को नहीं समझ सकते । इसलिये आप पहले पार हो जाइये। फिर आप समझेंगे और पूरी बात को आप जानेंगे। पार हुए बगैर कोई भी बात करना व्यर्थ जायेगा ।

अच्छा, अब बहुत समय (time) हो गया है, अब आप पार हो जाइये ।